बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बीड | बुधवार, दि.२४जुलै २०२४ | वर्षे३रे | अंक३६०वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## मंत्री काहीच कामाचे नाहीत

अकोला : महसूलमंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आमदारांचे फोन उचलत नाहीत. त्यांच्यासह भाजपचे चार मंत्री काहीच कामाचे नाहीत, अशी खरमरीत टीका राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांनी केली. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंवर टीका करताना आपण काय करतो? याचे देखील भान राखले गेले पाहिजे, असा सल्ला देखील त्यांनी दिला. संबंधित मंत्र्यांविरोधात मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना पत्र देणार असल्याचे त्यांनी सांगितले. सत्ताधारी आमदारांनीच टीकास्त्र सोडल्याने महायुतीतील मतभेद उघड झाले आहेत.महसूलमंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न आमदार अमोल मिटकरी यांनी केला होता. त्याला राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रतिसाद न दिल्याने अमोल मिटकरी यांनी संताप व्यक्त केला आहे.



# अर्थसंकल्प

## निर्मला सीतारामन : गरीब, महिला, तरुण आणि शेतकरी यांवर केंद्रीत!

### भविष्याचा वेध घेणारा अर्थसंकल्प :फडणवीस

अर्थसंकल्प हा भविष्याचा वेध घेणारा अर्थसंकल्प आहे. देशाचा अर्थसंकल्प देशातील युवा, गरीब आणि शेतकऱ्यांना डोळ्यासमोर ठेवून सादर करण्यात आला आहे, असे कौतुक करत विरोधकांनी अर्थसंकल्पावर केलेल्या टीकेला चोख प्रत्युत्तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

### न्याय देणारा समृध्द अर्थसंकल्प :आ.मुंडे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला आजचा अर्थसंकल्प हा देशातील महिला, तरुण, नोकरदार तसेच शेतकऱ्यांसह मोल मजुरी करणाऱ्या सर्वसामान्य जनतेच्या हिताला प्राथमिकपणे प्राधान्य देणारा असा समृध्द अर्थसंकल्प आहे अशा शब्दांत भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

एनडीए सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात आज केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला जात आहे. अर्थसंकल्पीय भाषणात हा अर्थसंकल्प गरीब, महिला, तरुण आणि शेतकरी यावर केंद्रित असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितलं आहे. २०२४-२५ साठी एकूण खर्च ४८,२०,५१२ कोटी रुपये अपेक्षित आहे. अर्थसंकल्पात रोजगार आणि कौशल्यावर भर देण्यात आला आहे. यामध्ये कृषी क्षेत्राला प्राधान्य देत १.५२ लाख कोटींची तर तरुणांसाठी २ लाख कोटींची तरतूद केल्याची माहिती त्यांनी दिली. जाणून घेऊयात आतापर्यंत बजेटमध्ये काय महत्त्वाचे मुद्दे मांडण्यात आले.अर्थसंकल्प सादर करताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणाल्या की, अंतरिम अर्थसंकल्पात नमूद केल्याप्रमाणे, आम्हाला ४ विविध जाती, गरीब, महिला, तरुण आणि शेतकरी यावर लक्ष केंद्रीत करणं आवश्यक आहे. शेतकऱ्यांसाठी, आम्ही सर्व प्रमुखांसाठी उच्च किमान आधारभूत किंमत जाहीर केली आहे. पीएम गरीब कल्याण अन्न योजना ५ वर्षांसाठी वाढवली आहे, त्यामुळे ८० कोटींहून अधिक लोकांना लाभ झाला आहे. निर्मला सीतारामन म्हणाल्या की, २ लाख कोटी रुपयांच्या केंद्रीय खर्चासह ५ वर्षांतील ४.१ कोटी तरुणांना रोजगार, कौशल्य आणि इतर संधी उपलब्ध करून देण्यासाठी ५ योजना आणि उपक्रमांचे पंतप्रधान पॅकेज जाहीर करताना मला आनंद होत आहे.

यावर्षी आम्ही शिक्षण, रोजगार आणि कौशल्यांसाठी १.४८ लाख कोटी रुपयांची तरतूद केली आहे. रोजगार, कौशल्य, एमएसएमई, मध्यमवर्गावर सतत लक्ष केंद्रीत केलं जात आहे. त्या म्हणाल्या की, रोजगार आणि कौशल्य प्रशिक्षणाशी संबंधित ५ योजनांसाठी २ लाख कोटी रुपयांचे बजेट आहे.भारताच्या अर्थव्यवस्थेची वाढ उत्कृष्ट आहे. भारताची चलनवाढ स्थिर राहून ४ टक्क्यांच्या लक्ष्याकडे वाटचाल करत आहे. गरीब, तरुण, महिला, शेतकरी अशा महत्त्वाच्या घटकांवर लक्ष केंद्रीत करण्याचा प्रयत्न केला जात आहे. केंद्र सरकारकडून २० लाख तरुणांना रोजगार देण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. कोणत्याही योजनेसाठी पात्र नसलेल्या विद्यार्थ्यांना देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी १० लाख रुपयांचे अर्ज देण्यात येईल.रस्ते मार्गाच्या विकासासाठी सरकारकडून प्रयत्न केले जातील. त्यासाठी तब्बल २६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली जाणार आहे.

### महाराष्ट्राला काय मिळाले?

| | |
|---|---|
| विदर्भ मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प | ६०० कोटी |
| महाराष्ट्र ग्रामीण रस्ते सुधार | ४०० कोटी |
| सर्वसमावेशक विकासासाठी इकॉनॉमिक कॉरिडॉर | ४६६ कोटी |
| पर्यावरणपूरक शाश्वत कृषि प्रकल्प | ५९८ कोटी |
| महाराष्ट्र कृषी आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्प | १५० कोटी |
| एमयूटीपी-३ | ९०८ कोटी |
| मुंबई मेट्रो | १०८७ कोटी |
| पुणे मेट्रो | ८१४ कोटी |
| नागपूर मेट्रो | ६८३ कोटी |
| मुळा मुठा नदी संवर्धन | ६९० कोटी |
| दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर | ४९९ कोटी |
| एमएमआर ग्रीन अर्बन मोबिलिटी | १५० कोटी |
| नाग नदी पुनरुज्जीवन | ५०० कोटी |

## मनोन जरांगेच्या विरोधात अटक वॉरंट

### चर्चा : पुणे न्यायालयाने आदेश दिले अटक करण्याचे

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी



नाट्यनिर्मात्याची फसवणूक केल्याचा आरोप असल्याप्रकरणी दाखल असलेल्या गुन्ह्याच्या सुनावणीला हजर न राहिल्याने मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्याविरोधात पुणे न्यायालयाने अटकेचे वॉरंट काढले आहे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी ए. सी. बिराजदार यांनी हे वॉरंट काढले आहे.

नाटकांचे प्रयोग आयोजित करून त्याचे पैसे न दिल्याप्रकरणी जरांगे यांच्यासह अर्जुन प्रसाद जाधव आणि दत्ता बहीर (सर्व रा. अंबड, जालना) यांच्याविरोधात फसवणूक व अपहार केल्याप्रकरणी कोथरूड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.याबाबत धनंजय घोरपडे (रा. वारजे) यांनी फिर्याद दिली होती. त्यानंतर न्यायालयाच्या निर्देशानुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात न्यायालयाने जरांगे पाटील यांना दोनदा समन्स बजावले होते. मात्र, आंदोलनामुळे ते न्यायालयात हजर झाले नव्हते. त्यामुळे न्यायालयाने जरांगे पाटील यांच्यासह अन्य दोन आरोपींविरोधात अजामीनपात्र वॉरंट बजावले होते.यापूर्वीही जरांगे यांच्याविरोधात न्यायालयात गैरहजर राहिल्याने अजामीनपात्र वॉरंट बजावण्यात आले होते. त्यानंतर जरांगे मे अखेरीस न्यायालयात हजर झाले होते. न्यायालयाने जरांगे यांना ५०० रुपयांचा दंड ठोठावून पुढील सुनावणीला नियमितपणे हजर राहण्याच्या अटींवर वॉरंट रद्द केले होते. परंतु, त्यानंतरही जरांगे सुनावणीला गैरहजर राहिल्याने अखेर न्यायालयाने त्यांच्याविरोधात अटकेचे वॉरंट काढले आहे.

## लाडक्या बहिणींचे नशिब निघाले!

### योजना : डॉ.योगेश,सारिकाताईंचे कार्यकर्ते भरताहेत अर्ज

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना बीड मतदारसंघातील गावागावात प्रभावीपणे राबविली जात आहे. शहरासह मतदारसंघातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, 'कल्पतरू'च्या सचिव डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिरे घेतली जात आहेत. दुसरीकडे योजना राबविताना येणाऱ्या अडचणींबाबत डॉ.योगेश क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची सोमवारी (दि.२२) भेट घेऊन निवेदन दिले.

बीड मतदारसंघात महायुती सरकारची महत्त्वकांक्षी असलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजना सर्वत्र राबविली जात आहे. यासाठी बीड मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांची यंत्रणा कामाला लागली आहे. या योजनेचा जास्तीत जास्त पात्र महिला भगिनींना लाभ मिळवून देण्यासाठी डॉक्टर क्षीरसागर यांच्या यंत्रणेकडून बूथनिहाय विशेष शिबिरे घेतली जात आहेत. ठिकठिकाणी अर्ज भरण्यासाठी महिलांनी गर्दी केली होती. पदाधिकारी, कार्यकर्ते महिलांना अर्ज भरून देत आहेत. त्यामुळे

पान २ वर...



मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना महत्वकांक्षी ठरणार आहे. ही योजना बीड मतदारसंघात प्रभावीपणे राबविणार आहोत. योजनेचे अर्ज भरून देण्यासाठी अनेक कार्यकर्ते कामाला लागले आहेत. महिलांनी या योजनेचा लाभ मोठ्या संख्येने घ्यावा. योजना राबविताना येणाऱ्या तांत्रिक अडचणींवर मात करण्यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू आहे.
-डॉ.सारिकाताई क्षीरसागर, सचिव, कल्पतरू.

## आरक्षण यात्रेत सहभागी होण्याचे निमंत्रण

### चर्चा : प्रकाश आंबेडकर यांचे शरद पवारांना पत्र

बीड/पुण्यभूमी प्रतिनीधी



राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) प्रमुख शरद पवार यांना वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी पत्र लिहून आरक्षण बचाव यात्रेत सहभागी होण्यासाठी निमंत्रित केले आहे. त्यांच्या सहभागी होण्याची मी वाट पाहत असल्याचेही आंबेडकर यांनी सांगितले आहे.

ओबीसी आरक्षण बचाव यात्रा २५ जुलैला चैत्यभूमी, मुंबई येथून सुरू होणार असून त्याच दिवशी पुण्यातील महात्मा फुले वाड्यालाही भेट देण्यात येणार आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यातून ही यात्रा जाणार आहे. काल मंत्री छगन भुजबळ यांनाही ड. आंबेडकर यांनी निमंत्रित केले होते. ड. आंबेडकर यांचे निमंत्रण स्वीकारून हे नेते आरक्षण बचाव यात्रेत सहभागी होणार का ? याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. ही यात्रा मुंबई येथून २५ जुलै रोजी निघणार असून पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, अहमदनगर, उस्मानाबाद, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशीम, बुलढाणा, जालना आणि औरंगाबाद येथे यात्रेचा समारोप होणार आहे.

# सरकारला पत्रकारांच्या शक्तीचे दर्शन घडेल!

**वसंत मुंडे**

### दिक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

केंद्र आणि राज्य सरकारची एकूण धोरणे लक्षात घेता जिल्हा, तालुका, गाव पातळीवरील छोटी वृत्तपत्रे आणि पत्रकार ही व्यवस्था कमजोर करण्याचीच राहिली आहेत. समाजातील विविध व्यावसायीक, नोकरदार, तरूण, महिला या घटकांना न्याय देताना पत्रकारांच्या मागण्यांकडे मात्र दुर्लक्ष केले जाते. सरकार मतपेढीचा विचार करून हजारो कोटींच्या घोषणा करते. मात्र सरकारच्या योजना लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम करणार्या पत्रकारांचेच प्रश्न पाठपुरावा करूनही सुटत नाहीत. पत्रकारही समाजातील प्रमुख घटक आहेत. याची आठवण करून देण्यासाठी संवाद यात्रा होणार आहे. संवाद ही नैसर्गिक प्रक्रिया असून ती थेट वैयक्तीक आणि संस्थात्मक परिवर्तन घडवते. यात्रा पत्रकारांचे प्रश्न सरकारला सांगण्यासाठी आणि पत्रकारांना समजुन घेण्यासाठी संधी प्रदान करणार आहे. रविवार दि.२८ जुलै रोजी नागपूरच्या दिक्षाभूमीतून यात्रेचा शुभारंभ होणार असुन यात्रेचा समारोप मुंबई मंत्रालय येथे होणार आहे असे पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

बीड येथील हॉटेल निलकमल येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी, लोकशाहीच्या बळकटीसाठी काढण्यात येणार्या दिक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा संदर्भात पत्रकार परिषद घेवून सविस्तर माहिती दिली. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ संपादक

पान २ वर...



### पत्रकारिता क्षेत्रात नवा इतिहास घडणार

पत्रकारांच्या विविध न्याय मागण्यांसाठी सर्व पत्रकारांना सोबत घेवून विविध राजकीय पक्ष, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील विचारवंत, नामवंत यांचा पाठींबा घेत नागपूर दिक्षाभूमी ते मंत्रालय मुंबई अशी पत्रकार संवाद यात्रा राज्याच्याच नव्हे तर कदाचित देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच निघणार आहे.

### कै. पत्रकार सोनवणे यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत

परखड आणि सडेतोड लिखाण करणारे पत्रकार सुधाकर सोनवणे यांचे कर्करोगाने अल्पवयात निधन झाले. त्यांच्या निधनानंतर दोन लहान मुले, पत्नी यांच्यापुढे जगावे कसे ? असा मोठा प्रश्न आर्थिक अडचणीमुळे निर्माण झालेला आहे.या कुटुंबीयांना आधार म्हणून पत्रकार संघाच्या वतीने रोख दहा हजार रुपयाची मदत यावेळी करण्यात आली. त्याचबरोबर सोनवणे यांच्या कुटुंबीयांना दानशूरांनी पुढे येऊन मदत करावी असे आवाहन पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.दानशूरांनी सोनवणे कुटुंबीयांना मदत करण्यासाठी मयत सुधाकर सोनवणे यांच्या धर्मपत्नी तत्त्वशीला सुधाकर सोनवणे यांच्या ९५ ६१ २५ ९२ ६७ या नंबरवर संपर्क साधावा.

## योजनेच्या अर्जासाठी मोफत मोहिम!

### धोरण: राजेंद्र मस्केंच्या संपर्क कार्यालयात महिलांची गर्दी!



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

भाजपा महायुती राज्य सरकारने गोरगरीब व सामान्य कुटुंबातील महिलांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना कार्यान्वित करून, २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये मानधन देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला. लाडकी बहिण योजनेच्या लाभासाठी विनामुल्य ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी आपला भाऊ.. आपल्या सेवेत या संकल्पनेतून भाजपा संघर्षयोद्धा जनसंपर्क कार्यालय बीड येथे सुरु केलेल्या विनामुल्य सेवा केंद्रात रोज महिलांची गर्दी होत असून, चार हजार आठशे बत्तीस महिलांचे फॉर्म ऑनलाईन नोंदणीकृत करण्यात आले.

शासनाने योजना जाहीर केल्यानंतर पदरमोड करून महिलांना ऊन, पावसात रांगेत उभे राहून फॉर्म भरण्याची धडपड करावी लागली. ग्रामीण भागात नेटवर्कची होणारी समस्या यासर्व त्रासदायी बाबींचा विचार करून, गोरगरीब महिलांपर्यंत लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी जनसंपर्क कार्यालयात १६ जुलै पासून विनामुल्य सेवा केंद्र सुरु केले. कामगार आघाडीचे संयोजक ओमप्रकाश गिरी, ज्योतिराम नन्नवरे, लालासाहेब पऱ्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सेवा केंद्रामध्ये सात ऑपरेटर सकाळी ११.०० ते ०५.०० यावेळेत कार्यरत

पान २ वर...

# ७० लाखाची बेकायदा कर्जमाफी भोवली!

## परतफेड | सुभाष जोशींना चेअरमन पदासाठी प्रचंड विरोध?

तेलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

भ्रष्ट कारभारासाठी गेल्या अनेक दिवसापासून चर्चेत असलेल्या बीड येथील पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेतील अनेक आर्थिक घोटाळे बाहेर येत असून बँकेचे संचालक डॉक्टर सुभाष जोशी यांचे जवळचे नातेवाईक आणि डॉ. सुभाष जोशी स्वतः या कर्जाला जामीनदार असलेल्या विकास मार्तंड पत्की यांना हरिहर अपार्टमेंट बांधकामासाठी ५० लाख रुपयाचे कर्ज दिले होते त्या कर्जाचे व्याजासह झालेले सत्तर लाख रुपये रक्कम बेकायदा माफ करून बँकेला खड्ड्यात घालणाऱ्या डॉक्टर सुहास जोशी हे बँकेचे चेअरमन पद आपल्याला मिळावे यासाठी बाशिंग बांधून बसलेले असताना निम्म्याहून अधिक संचालकांचा विरोध असल्याने डॉक्टर जोशी यांचे मनसुबे उधळले जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अधिक




व्रतांत असाकी, बीड शहरातील कधीकाळी नावाजलेल्या आणि आता भ्रष्ट कारभाराने राज्यात गाजत असलेल्या पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेतील पदाधिकाऱ्याने घोटाळे करून सामान्य खातेदार ठेवेदार यांच्या विश्वासाला तडा देण्याचे अविरत काम केले आहे. पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेतील जिल्ह्यातील व जिल्ह्या बाहेरील करोडो रुपयाचे झालेले आर्थिक घोटाळे संदर्भात जनता रस्त्यावर येत आहे. पूर्णवादी बँकेचे विद्यमान चेअरमन डॉक्टर अरुण गोविंद निरंतर यांनी बँकेच्या भ्रष्टाचाराचे आरोप सिद्ध झाले तर आपल्या गळ्यात नसलेले झंझट अडकू नये म्हणून तडका फडकी राजीनामा देऊन मोकळे झाले आता दोन दिवसात चेअरमन पदाचची निवड होणार असून बँकेतील डॉ.अरुण निरंतर यांचे नातेवाईक भ्रष्ट संचालक डॉक्टर सुभाष जोशी हे आपणच खुर्चीवर बसावे यासाठी अट्टाहास करत फिरत असल्याचे चित्र दिसत असून त्यांचे नातेवाईक विकास मार्तंड पत्की यांना स्वतः डॉक्टर जोशी यांनी जामीनदार होऊन ५० लाखाचे कर्ज दिले असता त्याचे व्याजासह ७० लाख रुपये झाले असताना देखील डॉक्टर सुभाष जोशी यांनी सदर रुपये सत्तर लाखाच्या कर्ज बेकायदा माफ करून बँकेला आर्थिक दृष्ट्या कंगाल बनवले आहे.

बँकेच्या हिताच्या विरोधात कार्य करणारा डॉक्टर सुभाष जोशी यांना चेअरमन पदाच्या खुर्चीवर बसविण्यासाठी एकूण निम्म्याहून अधिक संचालकांचा विरोध तीव्र होत असून कोणीही झाले तरी अनुभवी जुने जाणते संचालकापैकी कोणालाही चेअरमन पदाचे खुर्ची मिळावी परंतु डॉक्टर जोशी यांना या खुर्चीपासून कोसो दूर ठेवावे यासाठी अनेक संचालक मेहनत घेत आहेत. त्यामुळे चेअरमन पदाचे स्वप्न पाहणाऱ्या डॉक्टर सुभाष जोशी यांच्या स्वप्न भंग होणार का असा सवाल बीड जिल्ह्यात उपस्थित केला जात आहे.

# ब्लड स्टोरेजच्या माध्यमातून निश्चित फायदा

## डॉ.ओमप्रकाश शेटे: तिरुपती ब्लड स्टोरेज सेंटरचा शुभारंभ

तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई शहरात नव्याने रक्तदानाच्या माध्यमातून जीवनदान मिळण्यासाठी प्रथमच तिरुपती ब्लड स्टोरेज सेंटर चा शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. डॉ. ओमप्रकाश शेटे,आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समिती महाराष्ट्र राज्य मुंबई, यांच्या हस्ते थाटामाटात शुभारंभ संपन्न झाला.

या बाबत अधिक माहिती अशी की, या शुभारंभ सोहळ्यास प्रमुख उपस्थिती म्हणून महंत दिलीप बाबा घोगे, ह.भ.प. दत्ता म गिरी, ह.भ.प.नामदेव महाराज, माजी राज्यमंत्री बदामराव आबा पंडित युवा नेते शिवराज दादा पवार, यांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा संपन्न झाला तिरुपती ब्लड सेंटरचे संचालक डॉ. गोविंद



लेंडगुळे, डॉ. गायत्री पाटील लेंडगुळे, माध्यमातून ग्रामीण भागातील रुग्णांना तात्काळ सेवा उपलब्ध मिळतील रूग्णांना बीड येथे जाऊन ब्लड घेऊन येण्याची कसरत करावी लागत होती मात्र आता गेवराई शहरात सुविधा उपलब्ध झाली आहे. या शुभारंभ प्रसंगी बोलतांना डॉ. ओमप्रकाश शेट्टे म्हणाले की, आपल्या देशात अनेक राज्य, खंड आहेत प्रत्येक भागात वेगवेगळी जाती – धर्म , प्रथा परंपरा असून मात्र पाकिस्तान असो की भारत यात रक्त सर्वांचेच एकच आहे त्यामुळे रक्तदान करून रुग्णांना मदत केली पाहिजे शेवटी आपल्या सर्वांची माणूसकी हीच जात व मानवता हाच धर्म हे मानणारा पैकी मी एक आहे. या उद्घाटनप्रसंगी संजीवनी हास्पीटलचे संचालक डॉ संजय बाहेती, डॉ विजय सिकची, गेवराई तालुका डॉक्टर ओशियन. पत्रकार आल्ताफ कुरेशी, ,ईश्वर पवार, सचीन वावरे, रमेश आठवले सर्व डॉक्टर ,व नागरीक मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# म्हणून लाडका भाऊ योजना

## बालाजी चाटे : दहावीपासून योजनेचा लाभ द्या

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी



मुख्यमंत्री लाडका भाऊ योजना तूम्ही निवडणुका डोळ्यासमोर ठेवून चालू केली आहे पण तुम्ही काही अटी टाकल्या आहेत बारावी उत्तीर्ण झालेल्या सहा हजार रुपये व डिप्लोमा केलेल्या विद्यार्थ्यांना आठ हजार रुपये व उच्च शिक्षित विद्यार्थ्यांना १०००० रुपये तस जर अटी टाकल्याने जे गरीब विद्यार्थी मातंग समाजाच्या त्यांची परिस्थिती नसल्याने दहावीपासून शाळा सोडून दिली आहेत माझी एकच विनंती दहावीपासून पुढे सरसकट विद्यार्थ्या दहा हजार रुपये महिना देण्यात यावा जेणेकरून घरी गरीब परिस्थिती असल्याने दहावी पास असून कोणचं शिकलं नाही याची दक्षता घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दखल घेऊन सरसकट दहावीपासून पुढे १०००० महिना देण्यात यावा अशी विनंती युवा नेते बालाजी भैय्या चाटे करीत आहे.

# मुख्य रस्त्याचे काम संथ गतीने

## सुहास पाटील : अन्यथा तीव्र आंदोलन उभा करू

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड शहरातील नगर रोड हा मुख्य रस्ता असून ऐन पावसाळ्यात या रस्त्याचे काम सुरू केले मात्र तीन महिने उलटून देखील या रस्त्याच्या कामाला गती मिळत नसल्याने शहरातील नागरिक हवालदिल झाले आहेत. अनेक अपघात या ठिकाणी होत आहेत. शहरातील काम जलद गतीने होणे अपेक्षित होते मात्र त्यास विलंब होत आहे. हे काम लवकरात लवकर पूर्ण करा यासाठी आज बीड शहर शिवसंग्रामच्या वतीने जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना निवेदन देण्यात आले.

बीड नगर रोडचे काम सध्या अतिशय संथ गतीने सुरू आहे. सर्विस रोड म्हणून या रस्त्याची एक बाजू वापरण्यासाठी येत आहे परंतु



या सर्विस रोडवर अतिशय मोठे खड्डे झाल्याने पाणी साचत आहे . त्यामुळे वाहनधारकांना वाहने चालवताना कसरत करावी लागत आहे यात अनेक अपघात देखील घडत आहेत वाहन येत असताना पायी चालले तर या रोडवरती शक्यच नाही अशी परिस्थिती असताना देखील या रस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असून याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे तेव्हा हे काम लवकरात लवकर पूर्ण करा असे निवेदन आज जिल्हाधिकारी यांना शहर शिवसंग्रामच्यावतीने देण्यात आले त्याचबरोबर कामाची गती न वाढल्यास शिवसंग्राम रस्त्यावर उतरेल असेही निवेदनात म्हटले आहे. याप्रसंगी शिवसंग्रामचे बीड शहराध्यक्ष सुहास पाटील,महिला आघाडीचे जिल्हाध्यक्षा ड.मनीषा कुपकर, मनोज जाधव,सातीराम ढोले, गोपीनाथ देशपांडे, राहुल शहागडकर, अनिकेत देशपांडे, नदीम शेख गणी, लालाभाई, मुकुंद गोरे, गणेश धोंडरे,कैलास शेजाळ, अशोक लोकरे, हरिश्चंद्र ठोसर आदी सह शिवसंग्राम पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# मदनलाल कोटेचा यांचे निधन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी



येथील प्रतिष्ठित व्यापारी व जेष्ठ सुश्रावक श्री मदनलाल बन्सीलालजी कोटेचा (पिंपळगाव घाट )यांचे मंगळवारी सायंकाळी ०६.३० च्या सुमारास निधन झाले. धार्मिक स्वभावाच्या श्री मदनलाल जी यांनी जैन धर्मातील संथारा हे व्रत धारण केले होते. मृत्युसमयी त्यांचे वय ८३ वर्ष होते.

स्पष्टवक्ते ,तसेच गरजूंना कायम मदत करणारे. स्व. मदनलालजी प्रसिद्धी पासून कायम दूर राहिले. मृत्युनंतर त्यांनी नेत्रदान करून सामाजिक भान जपले. त्यांच्या पश्चात् श्री ऑटो एजन्सीचे श्री विशाल कोटेचा हे सुपुत्र तर पत्नी, बहीण ,दोन विवाहित मुली, सुना, जावई नातवंडे असा परिवार आहे. प्रसिद्ध व्यावसायिक श्री सुरेशकुमार व राजस्थानी सेवा समाज या संस्थेचे संचालक श्री स्नेहकांत कोटेचा यांचे जेष्ठ बंधू होत. त्यांची अंतिम यात्रा आज बुधवार सकाळी ९ वाजता त्यांच्या जालना रोड निवासस्थान असलेल्या हॉटेल शांताई मागे कोटेचा कॉलनी येथून निघणार आहे.

# लोकमान्य टिळक जयंती साजरी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

श्री श्री रविशंकर बाल मंदिर, आदर्श नगर व श्री श्री रविशंकर विद्यामंदिर पिंपरगव्हाण रोड बीड येथे आज दिनांक २३ जुलै २०२४ वार मंगळवार रोजी लोकमान्य टिळक यांच्या जयंतीच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे सदस्य श्री जैन सर, संस्थेचे सचिव श्री पारगावकर सर, शाळेचे मुख्याध्यापक श्री हंसेसर, शाळेच्या उपमुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी मॅडम यांच्या हस्ते लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना वंदन करण्यात आले.

इयत्ता चौथी वर्गातील स्वानंदी व इयत्ता आठवी वर्गातील श्लोक लखोटिया या विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळकांचा जीवन परिचय आपल्या भाषणातून करून दिला. कार्यक्रमात पुढे



विद्यार्थ्यांना लोकमान्य टिळकांच्या जीवन कार्यावर आधारित चित्रफीत दाखवण्यात आली. आपले मनोगत व्यक्त करतांना शाळेच्या उपमुख्याध्यापिका अनिता सुर्यवंशी मॅडम म्हणाल्या की, लोकमान्य टिळक यांनी संपूर्ण जीवन देशासाठी अर्पण केले. लोकमान्य टिळकांसारखे गुण, त्यांच्यासारखे देशप्रेम विद्यार्थ्यांनीही स्वतःमध्ये निर्माण करावेत असे विचार प्रकट केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन पूजा लांडे मॅडम यांनी केले सांस्कृतिक विभाग प्रमुख शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचे उत्कृष्ट असे नियोजन करून हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

# शिक्षक समितीचा वर्धापन दिन



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती ही शिक्षक बांधवांच्या न्याय हक्कासाठी लढणारी एक संघटना आहे. आज महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जिल्हा शाखा बीड कडून शिक्षक समितीच्या ६२ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले

त्यानिमित्त जिव्हाळा शहरी बेघर केंद्र बीड येथे आज महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या पदाधिकारी व शिक्षक बांधवाकडून जिव्हाळा केंद्रातील बेघर लोकांना फळांचे वाटप करण्यात आले यावेळी जिल्हाध्यक्ष महेश सातपुते यांनी शिक्षक समितीची माहिती सर्वांना दिली त्याचप्रमाणे पाटोदा तालुक्यामध्ये वर्धापन दिनानिमित्त पाटोदा तालुका अध्यक्ष भाऊसाहेब बांगर यांच्याकडून वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी राजेंद्र खेडकर सर, दिलीप खाडे सर,महेश सातपुते,सुरेंद्र गोल्हार,सानप एस. के,जी.डी. सानप,भाऊसाहेब बांगर,राहुल उंडाळे,उमेश सानप व योगेश सोळसे इत्यादी समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# आंबेडकरी चळवळीकडून नियुक्तीचे स्वागत!

## पदभार : नगर महानगरपालिका आयुक्तपदी यशवंत डांगे

नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यातील नावलौकिक मिळवलेली अहमदनगर महानगरपालिकेचा नवनिर्वाचित आयुक्त यशवंत डांगे यांचा आंबेडकरी चळवळीतील पदाधिकारी यांच्या कडुन सन्मान करण्यात आला.

आयुक्त यशवंत डांगे यांनी नुकताच अहमदनगर महानगरपालिका चा आयुक्त पदाचा कार्यभार स्वीकारला आहे अतिशय शिस्तबद्ध व उत्कृष्ट कामगिरीचा त्यांचा आलेख आहे संपुर्ण राज्यात एक शिस्त प्रिय अधिकारी म्हणून ते ओळखले जातात या अगोदर ज्या ठिकाणी त्यांनी सेवा दिली आहे तेथे उल्लेखनीय कामगिरी केली आहे राहुरी नगरपरिषद येथेही मुख्याधिकारी म्हणून ही त्यांनी काम पाहिले आहे त्या ठिकाणी



ही त्यांचा कार्याचा गौरव करण्यात आला होता

अहमदनगर शहरांतील आंबेडकरी चळवळीतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचा अहमदनगर महानगरपालिका नवनिर्वाचित आयुक्त पदी नियुक्ती झाली त्या निमित्ताने त्याचा सन्मान माजी नगरसेवक अजय साळवे जल अभियंता परिमल निकम राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे शहर अध्यक्ष सुरेश भाऊ बनसोडे पी आर पी चे जिल्हा अध्यक्ष सुमेध गायकवाड रिपाइं चे किरण दाभाडे रोहीत आव्हाड संजय कांबळे संजय जगताप कौशल गायकवाड पोपटराव जाधव सतिश साळवे आदी चा वतीने करण्यात आला अहमदनगर महानगरपालिकेला शिस्तप्रिय व प्रशासनावर वचक असणारे आयुक्त मिळाल्याने नगर शहरातील नागरिकांकडून मोठ्या अपेक्षा ठेवल्या आहेत

## अजित पवार | सरकारच्या योजनांचे कौतूक

# मुलींच्या शिक्षणाचा खर्च सरकारने घेतला!

नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

माझा जन्मच नगर जिल्ह्यात झाला आहे नगर हे माझे आजोळ आहे म्हणून लाडकी बहीण योजनेचा संवाद दौऱ्याची सुरुवात येथुन करत आहे असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री ना अजित दादा पवार यांनी नगर येथील लाडकी बहीण योजनेचा संवाद कार्यक्रमात केले

आपले राज्य हे छ शिवाजी महाराज शाहू फुले आंबेडकर विचारांचे प्रगत शील राज्य आहे माझी लाडकी बहीण योजनेसाठी ४५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे त्यांना महिन्याला १५०० रुपये देण्यात येणार आहेत या माध्यमातून महिला आपल्या कुटुंबाला व मुलाबाळांना आर्थिक हातभार लावतील महिला आपल्या कुटुंबासाठी सतत असतात गरिबांची मला जाणीव आहे या योजनेत कोणतीही जात–पात धरली नाही सरसकट २१ ते ६५ वयोगटातील महिलांना याचा लाभ मिळेल तसेच आता वर्षातून ३० गॅस सिलेंडर चे पैसे सरकार महिलांच्या खात्यावर जमा करणार



### आ.संग्राम जगतापांच्या कामाचे कौतुक

उपमुख्यमंत्री ना अजित दादा पवार यांनी लाडकी बहीण संवाद मेळाव्यात नगर शहराचे आमदार संग्राम जगताप यांचे विशेष कौतुक केले चांगल्या कामाला पाठिंबा दिलाच पाहिजे आमदार जगताप यांचे काम चांगले असुन शहराचे विकासाचे काम घेऊन ते कायम येत असतात ते काम मार्गी लावुनच घेतात. त्यांना पाठिंबा हा दिलाच पाहिजे

आहे तसेच मुलींना उच्च शिक्षणासाठी १०० टक्के रक्कम सरकार भरणार आहे चांगल्या कामाला पाठिंबा दिला पाहिजे नगर शहरात आमदार संग्राम जगताप यांचे काम चांगले आहे चांगल्या कामाला पाठिंबा दिलाच पाहिजे आमदार संग्राम जगताप हे कायम शहराचे काम घेऊन येतात व त्यांचे का मार्गी लावुन घेत असताताशहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी या मेळाव्याचे उत्कृष्ट नियोजन केले असल्याचे प्रतिपादन ना अजित दादा पवार यांनी केले

यावेळी व्यासपीठावर महिला व बालकल्याण मंत्री आदित्य तटकरे महिला प्रदेशाध्यक्ष रूपाली चाकणकर माजी आमदार अरुण काका जगताप आमदार संग्राम भैय्या जगताप शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर माजी उपमहापौर गणेश भोसले कुमारसिंह वाकळे अविनाश घुले सामाजिक न्याय विभागाचे अहमदनगर शहर जिल्हाध्यक्ष सुरेश भाऊ बनसोडे महिला शहर जिल्हाध्यक्ष रेश्मा आठरे आदी उपस्थित होते.उपमुख्यमंत्री ना अजित दादा पवार यांच्या स्वागतासाठी ठिक ठिकाणी गुलाबी बैनर लावले असल्याने नगर शहर हे गुलाबीमय झाले होते.

# माजलगावमध्ये ओबीसी मेळावा

## मिनाक्षी डोमाळे: उपस्थित राहण्याचे आवाहन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव येथे दि.२५ जुलै २०२४ रोजी ओबीसी समाजाचा भव्य मेळावा होणार असून या मेळाव्यास प्रा.लक्ष्मण हाके आणि नवनाथ आबा वाघमारे हे उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत तरी या मेळाव्यास ओबीसी बंधु–भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अहिल्या महिला आघाडीच्या प्रदेश सचिव मिनाक्षी देवकते डोमाळे यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, ओबीसी समाजाचे आरक्षण कायम ठेवून इतर कोणालाही त्यामध्ये समावेश होवू नये याकरीता तसेच ओबीसी समाजाचे शासन दफ्तरी असलेले विविध प्रश्न या विषयी मार्गदर्शन करण्यासाठी



वडीगोद्री येथे ओबीसी समाज बांधवांसाठी आमरण उपोषण केले प्रा.लक्ष्मण हाके सर आणि नवनाथ आबा वाघमारे हे ओबीसी समाजातील युवक, युवतींना तसेच सर्व महिला भगिनींना मार्गदर्शन करणार आहेत त्यामुळे या भव्य ओबीसी मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मिनाक्षी देवकते डोमाळे यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

**सुविचार** - आत्मसमाधान ही खरी समृद्धी आहे; ती प्राप्त करण्याचा प्रयत्न करा.

## संकल्पात 'अर्थ' असेल...?

मोदी सरकारचे अपेक्षित तिसरे पर्व अनपेक्षित धक्क्यातून सुरू झाले. अनपेक्षित या अर्थी की यावेळी भाजप आघाडी अगदी सहज बहुमत प्राप्त करेल, एवढेच नव्हे तर एकटा भाजप ३७० चा आकडा ओलांडेल अशीच वातावरण निर्मिती करण्यात आली होती; परंतु भाजपच्या या अपेक्षेला मतदारांनी प्रचंड मोठा धक्का दिला. भाजप आघाडीची बहुमताचा आकडा गाठताना पुरती दमछाक झाली. या पृष्ठभूमीवर मोदी सरकारच्या तिसऱ्या पर्वाचा पहिला अर्थसंकल्प कसा असेल याची सगळ्यांनाच उत्सुकता आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन विक्रमी सातव्यांदा हा अर्थसंकल्प मंगळवारी संसदेपुढे मांडणार आहेत. लोकसभा निवडणुकीत भाजपला गरीब, अल्पसंख्याक समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागले. त्यामुळे या अर्थसंकल्पात काही महत्त्वाचे बदल अपेक्षित आहेत. अर्थात गरीब आणि शेतकरी वर्गाच्या कल्याणासाठी अतिरिक्त खर्च करायचा असेल तर सरकारच्या तिजोरीत तितका अतिरिक्त पैसा यायला हवा. सरकारचे उत्पन्न वाढायला हवे. हे उत्पन्न वाढविण्याचा राजमार्ग म्हणजे करामध्ये वाढ करणे हाच आहे. कर वाढविणे हा पर्याय सरकारसाठी नेहमीच त्रासदायक असतो. करवाढ कुणालाच रुचत नाही. करवाढ न करता करदात्यांची व्याप्ती वाढविणे हा एक पर्याय ठरू शकतो. सध्या करदात्यांकडून करपात्र उत्पन्नाची मर्यादा पाच लाखांवरून सात लाखांपर्यंत वाढवावी अशी मागणी केली जात आहे. त्यामुळे या वर्गातील लोकही गुंतवणुकीकडे वळतील, असे त्यांचे म्हणणे आहे; परंतु एक बाब लक्षात घेणे गरजेचे आहे की भारतामध्ये सध्या केवळ आठ टक्के लोक कर भरतात आणि उत्पन्नावरील करभरणा वाढला तरी संपत्तीमधील वाढत जाणाऱ्या विषमतेला वेसण घालता येत नाही. मागील दोन दशकांचा अनुभव हेच सांगतो. सध्या तरुण, शिक्षित बेरोजगारांच्या संख्येमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. त्यामुळे शिकाऊ उमेदवारी योजना आवश्यक आहे. सोबतच वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांची संख्या वाढवण्याची गरज आहे. यासाठी बड्या उद्योगपतींना गुंतवणुकीसाठी करामध्ये सवलत देता येईल. मनरेगा योजनेचाही विस्तार होण्याची आवश्यकता आहे. शहरातही ही योजना लागू व्हायला हरकत नसावी. पदवीधर विद्यार्थ्यांना पायाभूत सुविधा आणि कल्याणकारी योजनांचे मूल्यांकन करण्याच्या क्षेत्रात रोज रोजगार उपलब्ध होऊ शकतो. मनरेगातून निर्माण होणारे प्रकल्प अधिक उत्पादक कसे होतील याचाही विचार होणे आवश्यक आहे. अर्थात सरकार समोरची मुख्य समस्या तिजोरीत पुरेसा निधी उपलब्ध कसा होईल हीच आहे. वर म्हटल्याप्रमाणे सर्वसामान्य करदात्यांना अधिक भुर्दंड देणे योग्य ठरणार नाही. आपल्या देशातील प्राप्तिकर परतावा भरणाऱ्यांपैकी ५५ टक्के लोकांचे उत्पन्न फक्त २.५ लाख रुपये असते. करपात्रतेसाठी प्रत्येक व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न पाच लाख रुपयांहून जास्त असणे आवश्यक असते. या सात कोटी करदात्यांवर ३५ कोटी लोक अवलंबून असावेत. उरलेले सुमारे १०० कोटी लोक हे अतिगरीब म्हणता येतील. रोजगार निर्मितीसाठी कर लावणे आवश्यक आहे. हा कर लावताना सर्वसामान्य, मध्यमवर्गीय किंवा त्याही खालच्या स्तरातील लोकांना कोणतीही झळ पोचणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे. त्यामुळे कर लावताना ज्यांचे उत्पन्न १ कोटीपेक्षा जास्त असेल त्यांच्यासाठी १टक्के. , ५० कोटी उत्पन्नावर २टक्के आणि रु. ५०० कोटींच्या वर ज्यांचे उत्पन्न आहे त्यांना ३टक्के अशी कर योजना लागू केल्यास सरकारच्या तिजोरीत भर तर पडेलच शिवाय कुणालाही त्याची फारशी झळ पोहचणार नाही. हा कर साधारणपणे एक लाख करदात्यांना लागू होईल आणि त्यातून ७० हजार कोटी जमा होऊ शकतील. हे पैसे केवळ गरिबी निर्मूलन कार्यक्रमासाठी वापरले जातील याची दक्षता घेतली जावी. रोजगार निर्मितीसाठी डॉ. अजित रानडे यांनी सुचवलेला सकल उत्पन्न १०० कोटींहून अधिक असल्यास एक टक्के वेगळा कर लागू करणे हेही शक्य आहे. यातून सुमारे रु. २५००० कोटी मिळू शकतील. थोडक्यात काय तर सरकार पुढे आर्थिक आव्हाने खूप मोठी आहेत आणि त्याला तोंड देण्यासाठी सरकारी तिजोरीत तसा खडखडाट आहे. त्यामुळे पैसा उभा करणे आणि तो उभा करताना कोणालाही आपली पिळवणूक होत आहे असे वाटू न देणे आणि उभा केलेला पैसा देशाच्या गरिबी निर्मूलनासाठी, शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान सुधारण्यासाठी वापरणे हेदेखील एक मोठे आव्हान आहे. निर्मला सीतारामन हे आव्हान पेलून मोदी सरकारची प्रतिमा सावरण्यात यशस्वी होतात की नाही, हे पाहणे उद्बोधक ठरेल. अर्थसंकल्प सादर तर होईल; परंतु त्यात कोरड्या आकड्यांचा तितकाच कोरडा दिलासा मिळत असेल तर लोकसभा निवडणुकीत ठेच लागल्यावरही मोदी सरकारला शहाणपण आले नाही, असेच म्हणावे लागेल. त्यामुळे अर्थसंकल्पात खऱ्या अर्थाने 'अर्थ' ओतण्याची मोठ्ठी जबाबदारी निर्मला सीतारामन यांच्या खांद्यावर आहे.

## कमला हॅरिस की...?

जो बायडेन यांनी अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीतून माघार घेतल्यानंतर डेमोक्रॅटिक पक्षाचे अध्यक्षीय पदाचे उमेदवार कोण असतील या चर्चेला उधाण आले आहे. जो बायडेन यांनी आपली पसंती कमला हॅरिस असल्याचे स्पष्ट केले आहे; परंतु पक्ष त्यांच्याच नावावर शिक्कामोर्तब करेल याची खात्री देता येत नाही. विद्यमान अध्यक्ष म्हणून बायडेन यांच्या पदाला आणि मताला वजन निश्चित आहे. शिवाय यावेळीही त्यांनी बायडेन पक्षांतर्गत झालेली निवडणूक त्यांनी बहुमताने जिंकली आहे. त्यातच अध्यक्षीय निवडणुकीला म्हणजे जेमतेम शंभरहून थोडे अधिक दिवस उरलेले आहेत. त्यामुळे प्रचाराला फार अवधी राहिलेला नाही. अशा परिस्थितीत कमला हॅरिस यांना उमेदवारी देऊन त्यांच्या प्रचारावर लक्ष केंद्रीत करणे पक्षाला अधिक सोयीचे जाईल; परंतु करावे, तांत्रिकदृष्ट्या डेमोक्रॅटिक पक्षाच्या डेलिगेट्सवर बायडेन यांच्या उत्तराधिकारी म्हणून कमला हॅरिस यांच्या नावासमोर शिक्का मारण्याचे बंधन नाही आणि तसे झाल्यास पक्षाला तातडीने उमेदवार ठरवण्यासाठी निवडणूक घ्यावी लागेल. पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या आणि प्रतिनिधिगृहाच्या माजी सभापती नॅन्सी पलोसी पक्षाच्या उमेदवारीवर दावा करीत आहेत; परंतु त्यांना डेमोक्रॅटिक पक्षात पाठिंबा मिळण्याची शक्यता फार नाही. त्यामुळे विद्यमान उपाध्यक्ष आणि बायडेन यांच्या नावाची पसंती मिळालेल्या हॅरिस यांचेच नाव अंतिम निवडणुकीसाठी जाहीर होण्याची शक्यता सर्वाधिक आहे. कमला हॅरिस यांच्या नावावर मतैक्य झाले नाही आणि निवडणूक घ्यावी लागली, तर काही संभाव्य नावांची चर्चा बायडेन यांच्या माघारीआधीच सुरू झाली होती; परंतु त्यात नॅन्सी पलोसी यांचे नाव नव्हते. अर्थात अन्य संभाव्य उमेदवारांमध्ये सध्या तरी कमला हॅरिस यांना पर्याय ठरू शकेल इतके मोठे नाव कुणाचेच नाही. त्यामुळे अचानक काही अनपेक्षित घडामोडी घडल्या नाही तर अमेरिकेच्या अध्यक्ष पदाची लढत डोनाल्ड ट्रम्प आणि कमला हॅरिस यांच्यात रंगण्याची चिन्हे दिसत आहेत. ट्रम्प यांचा मतदार प्राधान्याने गोरा, ग्रामीण, पारंपरिक वर्गातला मोडतो. त्यामुळे ट्रम्प कमला हॅरिस यांच्या गौरेतरपणाचा मुद्दा प्रचारात आणू शकतात. शिवाय अमेरिकेतील पारंपरिक मतदाराने आतापर्यंत एकाही स्त्रीला अध्यक्षपदावर बसवलेले नाही. या आधी हिलरी क्लिंटन ट्रम्प यांच्यासमोरच अपयशी ठरल्या होत्या. या सगळ्या पृष्ठभूमीवर सध्या तरी या संभाव्य लढतीत ट्रम्प यांचेच पारडे जड दिसत आहे.

### स्थित्यंतर




**राही भिडे**

9867521049


## स्ट्राईक रेट वाढवण्यासाठी जोरबैठका

येत्या ऑक्टोबरमध्ये विधानसभेच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता असल्याने सर्वच राजकीय पक्षांच्या जोरबैठका सुरू आहेत. युती आणि आघाडीतील सुंदोपसुंदी बरोबरच प्रत्येक पक्षात जागा वाटपासंदर्भात वाद उघड होत आहेत. महायुतीत तर अजित पवार यांच्या समावेशावरून संघ परिवार नाराज असल्याचे त्यांच्या मुखपत्रातून वारंवार निदर्शनास आणून दिले जात आहे. महाविकास आघाडीतही जागांवरून शिवसेना आणि काँग्रेसमध्ये ताणाताणी आहे. त्यातच तिसऱ्या, चौथ्या आघाडीसाठीही मोर्चेबांधणी सुरू आहे. सर्वच पक्षांनी बैठकांचा सपाटा लावला आहे. विधानसभेच्या जागा मर्यादित, पक्षांची संख्या जास्त आणि त्यांच्याकडे इच्छुकांची भाऊगर्दी या पार्श्वभूमीवर जागावाटप आणि उमदेवारी देण्यावरून चांगलाच संघर्ष होण्याची शक्यता आहे. आता सतरंज्या उचलायला कुणीच तयार नाही. प्रत्येकाला आमदार व्हायची घाई झाली आहे. पक्ष कोणताही असो अधिकाधिक जागा पदरात पाडून घेण्याचा महायुती आणि महाविकास आघाडीतील पक्षांचा प्रयत्न आहे. एखाद-दुसरी बैठक झाली असताना राजकीय पक्षांनी आम्ही इतक्या इतक्या जागा लढवणार असल्याचे सांगायला सुरुवात केली आहे. विधानसभेच्या २८८ जागा असताना प्रमुख सहा राजकीय पक्षांचे दावे पाहिले, तर विधानसभेच्या ७०० जागा आहेत, की काय असे वाटावे, अशी स्थिती आहे. लोकसभेच्या निवडणुकीत कमी जागा लढवून जादा जागा मिळवल्याने विधानसभेला १२५ जागा मिळाव्यात, असा आग्रह महाविकास आघाडीत काँग्रेसने धरला आहे, तर शिवसेनेनेही तेवढ्याच जागा लढवण्याची तयारी केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानेदेखील कमी जागा लढवून जास्त जागा जिंकल्याने या पक्षालाही जास्त जागा हव्या आहेत; परंतु त्यांनी कुठेही दबावाचे राजकारण केलेले नाही. शरद पवार यांनी एकदाच महाविकास आघाडी टिकावी, म्हणून लोकसभेचा त्याग केला, त्याची भरपाई विधानसभेच्या निवडणुकीत झाली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली असली, तरी महाविकास आघाडी एकसंघ ठेवण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. त्यामुळे अन्य दोन मित्र पक्ष परस्परांवर कुरघोड्या करीत असताना पवार यांनी बेरजेचे राजकारण सुरू केले आहे. काँग्रेसचे नेते कितीही जागांचा आग्रह धरत असले, तरी पवार राज्यातील नेत्यांपेक्षा राहुल गांधी यांच्यांशी बोलूनच जागावाटप करतील. राहुल, पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यात अंतिम चर्चा होऊनच जागा वाटप होईल. आता होत असलेल्या कुस्त्या या लुटूपुटूच्या आहेत. मुंबईवरचे वर्चस्व ठाकरे यांनी कायम ठेवले आहे. लोकसभा आणि विधानपरिषदेच्या निवडणुकीतही ते त्यांनी सिद्ध केले असल्याने आता त्यांनी मुंबईतील ३६ पैकी २५ जागांवर दावा केला आहे. या न्यायाने पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भात शिवसेनेला नगण्य जागा दिल्या जातील. तिथे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस अधिक जागा पदरात पाडून घेईल.

ठाकरेंच्या शिवसेनेने मुंबईमधील शिवडी, भायखळा, वरळी, माहीम, चेंबूरसह २५ विधानसभेच्या जागांवर निवडणूक लढण्याची तयारी केली आहे. वांद्रे पूर्वमधून युवासेनेचे सचिव वरुण सरदेसाई, तर दहिसरमधून तेजस्वी घोसाळकर यांना पहिल्यांदाच विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरविले जाण्याची शक्यता आहे. याशिवाय अनेक नव्या चेहऱ्यांना विधानसभा निवडणुकीसाठी ठाकरेंच्या शिवसेनेकडून संधी मिळणार असल्याची चर्चा आहे. महाविकास आघाडीमध्ये निवडणूक लढवताना राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेससोबत काही जागांमध्ये अदलाबदल केली जाण्याची शक्यता असून याचा निर्णय महाविकास आघाडीच्या बैठकांमध्ये वरिष्ठ पातळीवर होणार आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेने मुंबईतील ३६ पैकी १४ जागा जिंकल्या होत्या; मात्र शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतर त्यातील आठ आमदार ठाकरे यांच्यासोबत आहेत, तर सहा आमदार शिंदे यांच्यासोबत आहेत. त्यामुळे मुंबईतील जिंकलेल्या जागा आणि ज्या ठिकाणी एकापेक्षा अधिक उमेदवार इच्छुक आहेत आणि जिथे नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत विधानसभा क्षेत्रात ठाकरेंचा उमेदवार असताना अधिक मताधिक्य मिळाले आहे, अशा जागांचा ठाकरे यांच्याकडून निवडणूक लढवताना आग्रह केला जाऊ शकतो. महाविकास आघाडीसाठी एकूण तीन फॉर्म्युले ठरले आहेत. पहिला फॉर्म्युला काँग्रेस ९६, ठाकरेंची शिवसेना ९६ आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीने ९६ जागा लढाव्यात. दुसरा फॉर्म्युला काँग्रेसने ९६ ते १००, शिवसेनेने ९६ ते १०० जागा, आणि पवारांना ९० ते ९६ जागा लढाव्यात. तिसरा फॉर्म्युल्यात काँग्रेस आणि ठाकरे यांनी प्रत्येकी शंभर जागांवर लढावे आणि पवार यांच्या पक्षाने ८८ जागांवर लढावे, असे सुचवण्यात आले आहे. विधानसभेला जो जिंकेल त्याची जागा, हे लोकसभेप्रमाणेच सूत्र असणार आहे, असे म्हणत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी महाविकास आघाडीचे तिन्ही पक्ष २८८ जागांची चाचपणी करत असल्याचा दावा केला. दरम्यान, महाविकास आघाडीकडून यंदाच्या निवडणुकीत मुख्यमंत्रिपदाचा कोणताही चेहरा दिला जाणार नाही. तथापि, लोकसभा निवडणुकीत चांगले यश मिळविले याचा लाभ मिळविण्याचा प्रयत्न आघाडी खचितच करील.

दरम्यान, फॉर्म्युल्यावर बैठका घेऊन महाविकास आघाडीने लोकसभेप्रमाणेच विधानसभेच्या मोर्चेबांधणीसाठी एक पाऊल पुढे टाकले आहे. लोकसभेत अनेक जागांवर उशिरा उमेदवार दिल्यामुळे महायुतीला फटका बसल्याची तक्रार पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली होती. त्यामुळे विधानसभेला महायुतीचा फॉर्म्युला लवकर जाहीर होण्याची शक्यता आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाने ८० ते ९० जागांची मागणी केली असतानाच, शिवसेना शिंदे गटानेही महायुतीत १०० जागा मिळाव्यात, अशी मागणी पुढे केली आहे. दोन्ही मित्र पक्षांची मागणी लक्षात घेता भाजपच्या वाट्याला किती जागा येतील, असा प्रश्न भाजपच्या नेत्यांना पडला आहे. शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या नेत्यांच्या बैठकीत भाजपकडे किमान शंभर जागा मिळाव्यात, अशी मागणी करण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून त्यांच्या बरोबर गेलेल्या अपक्षांसह ४८ आमदारांसाठी त्यांचे मतदारसंघ कायम ठेवणार असल्याचा विश्वास शिंदे यांनी दिला आहे. याशिवाय आणखी ५० मतदारसंघांची मागणी महायुतीत करण्यात येणार आहे. महायुतीत शिवसेनेची ताकद असल्याने पक्षाला १०० जागा मिळाव्यात, अशी भूमिका मांडण्यात आली. भाजपच्या बैठकीत ज्या आमदारांनी लोकसभा निवडणुकीत चांगली कामे केली नाहीत, त्यांची विधानसभेची उमेदवारी धोक्यात येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्याचबरोबर भाजप विधानसभेत १५० जागा लढवणार असल्याची शक्यता आहे. भाजपने मिशन विधानसभेसाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. भाजपच्या राज्यातील नेत्यांनी विधानसभा निवडणुकीत १७० ते १८० जागा लढवण्याचा सूर आळवला आहे. त्याला वरिष्ठ नेत्यांचीही अनुकुलता आहे. भाजप नेत्यांनी एवढ्या मोठ्या प्रमाणावर जागा मागितल्याने महायुतीतील घटक पक्ष असलेल्या शिंदे आणि अजितदादा गटाला टेन्शन येण्याची शक्यता आहे.

अजितदादा गटाने यापूर्वीच ८० जागा लढवण्याची इच्छा बोलून दाखवली आहे. शिंदे यांच्या गटाकडे असलेल्या आमदारांच्या संख्येएवढेच आमदार आपल्याकडेही असल्याने आपल्यालाही समान वाटा मिळाला पाहिजे, असे अजितदादा गटाचे म्हणणे आहे. युती आघाडीत असे ताणतणाव असताना रिपब्लिकन पक्षांमधील आठवले, गवई, कवाडे गटांसह अनेक वेगवेगळे गट तसेच सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या आंबेडकरी विचारसरणीच्या विविध संघटनांची मोट बांधून एकसंघ रिपब्लिकन आघाडी तयार करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहे; परंतु त्यांना कितपत यश मिळेल याबद्दल शंका आहे. छोट्या पक्षांचा वापर प्रतिस्पर्ध्यांची मते कमी करण्यासाठी होतो हे सर्वश्रुतच आहे.

### सरळ-सरळ




**राजेश राजोरे**

9822593903


## पुन्हा एक वेळ : सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?

महाराष्ट्र राज्यावर ७ लाख ८२ हजार ९९१ कोटींचे प्रचंड असे कर्ज असतांना, सत्ताप्राप्तीसाठी घेतलेले असे निर्णय सुज्ञ मतदारांकडून समर्थनिय ठरु शकत नाही. अशा योजना अनेक गैरप्रकाराला, आळशीपणाला तसेच रोजगारहिनतेला प्रोत्साहन देणाऱ्या ठरतात, एवढे मात्र खरे! फुकट द्यायचेच असेल तर आरोग्य सोयी, सर्व प्रकारचे शिक्षण आणि न्याय निशुल्क दिले पाहिजे.

**अंधा बाटे रेवडी... सियासती है दौर।**
**कर्मशील हैरान हैं.... चोरों के सिर मौर।।**

भारताचा स्वातंत्र्य लढा सर्वांच्या स्मरणात आहे. इंग्रजी जुलमी राजवटीच्या विरुध्द आंदोलनकारी नेते लढा देत होते. तर इंग्रज सरकार आंदोलन व नेते यांना चिरडून काढण्यासाठी, सरकार वाचविण्यासाठी अघोरी, जालीम अशा उपाययोजना करीत होते. तसे करणे हे प्रत्येक सरकारचे कर्तव्यच असते का? हे आजचे सरकार पाहून वाटते, हा भाग वेगळा. मात्र तेव्हाचे इंग्रज सरकार अंत्यत निर्दयी, निष्ठूर व सर्वकाही हिसकावून घेणारे होते, या उलट आजचे मायबाप सरकार हे निवडणुका आल्या की, अंत्यत मायाळू, प्रेमळ, दयाळू व खूप काही देणारे, किंबहुना विविध योजनांव्दारे पैसे उधळणारे सरकार अशी प्रतिमा तयार करते.

अनेक वेळा सरकार असे का वागते? असा प्रश्न अनेकांना पडतो, तर आश्चर्यही वाटते. मात्र असे करणे गरजेचे असते का? याचे दूरगामी दुष्परिणाम नागरिकांवर व व्यवस्थेवर होणार नाहीत का? समाजाचा काही विचार करणार की, फक्त खुर्च्या टिकविण्याचा? अमिष दाखवून, फुकट देऊन लोकांना आळशी बनवून आपण बेरोजगारी वाढविणार आहोत की स्वकमाईने स्वाभीमानी राहण्यास शिकविणार आहोत? असे अनेक प्रश्न निर्माण होतात, तेव्हा पुन्हा एक वेळ लोकमान्य टिळकांच्या भाषेत विचारावेसे वाटते, 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?'

महाराष्ट्रात भाजपा, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी (अजितदादा पवार गट) अशी संयुक्त व इतर मिळून महायुतीचे सरकार आहे. येत्या तीन महिन्यात महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका येऊ घातल्या आहेत. पुन्हा निवडून येण्याचे प्रयत्न युध्दपातळीवर करतांना या सरकारने मागील काही दिवसात खूप घोषणा, योजना, निर्णय जाहीर केले आहेत. खरेतर आपली 'लाडकी खुर्ची' योजनेसाठी (वाचविण्यासाठी) 'लाडकी बहीण, लाडका भाऊ' अशा बहुचर्चित योजना सुरु करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे या व अशा सर्व योजना सुरु रहाव्यात यासाठी महायुतीच्या सरकारच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन मतदारांना करण्यात येत आहे.

सरकारच्या अनेक योजनांचे बाबतीत संबंधित घटकांना व नागरिकांना आश्चर्य वाटत असते. मुळात या योजनांची मागणी कुणी, केव्हा केली. यासाठी केव्हा, कोणती आंदोलने झालीत. या उलट जे दैनंदिन जीवन जगण्यासाठी, स्वकर्तृत्व निर्माण करण्यासाठी मागणी असलेली, पुरेसा व अखंड वीजपुरवठा, सिंचनासाठी पाणी, पिण्यासाठी भरपूर शुध्द पाणी (टँकर मुक्त महाराष्ट्र), अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्यासाठी पुरेसा निधी व राजकीय इच्छाशक्ती, उद्योगांना भरपूर सोई व सवलती, शासकीय कर्मचाऱ्यांची व पोलीसांची भरती, आदी सर्व मागण्या अनेक वर्षांपासून मागूनही मिळत नाही.

आज २३ जुलै. लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांचा २३ जुलै १८५६ हा जन्म दिन. त्यांनी १२७ वर्षापूर्वी १८९७ मध्ये 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?' या शिर्षकाखाली लेख लिहिला होता. पुण्यात प्लेगच्या साथीच्या काळात सरकारी उपाययोजनांची टीका करताना त्यांनी हा लेख 'केसरी' या त्यांच्या वृत्तपत्रात लिहिला होता. या लेखामुळे त्यांच्यावर ब्रिटिश सरकारने देशद्रोहाचा आरोप ठेवला आणि त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. नंतर याच शिर्षकाने २७ फेब्रुवारी १९८७ रोजी प्रसिध्द पत्रकार आणि लेखक अरुण शौरी यांनी लिहिला. त्यांनीही त्या काळातील राजीव गांधीच्या सरकारच्या धोरणांवर आणि कामकाजावर टीका केली होती. आज या गोष्टींचे स्मरण होत आहे.

विनामूल्य वस्तू, पैसा, योजना वाटण्यासाठी सरकारचा पैसा खर्च करणे याला अनेकांचा विरोध आहे. तर हे सर्व 'रेवडी बाटणा'चे प्रकार शेवटी जनतेच्याच, कर धारकांच्याच पैश्यातून केले जातात, उलट सरकारी हस्तक्षेपामुळे मध्यस्थांचे खिसे भरले जातात, असा अनुभव आहे. तर अशा प्रकाराने समाजात दुही निर्माण होते, एका वर्गात वेगळी भावना निर्माण होते.

महाराष्ट्र राज्यावर ७ लाख ८२ हजार ९९१ कोटींचे प्रचंड असे कर्ज असतांना, सत्ताप्राप्तीसाठी घेतलेले असे निर्णय सुज्ञ मतदारांकडून समर्थनिय ठरु शकत नाही. मात्र यातील बहुतांश मतदार हे मतदानालाच जात नाही. म्हणून यांची चिंता करणे सत्ताधिशांना गरजेचे वाटत नाही. परंतु अशा योजना अनेक गैरप्रकाराला, आळशीपणाला तसेच रोजगारहिनतेला प्रोत्साहन देणाऱ्या ठरतात, एवढे मात्र खरे! फुकट द्यायचेच असेल तर आरोग्य सोयी, सर्व प्रकारचे शिक्षण आणि न्याय निशुल्क दिले पाहिजे.

शेवटी या फुकट सरकारी योजनांसाठी चार ओळी आठवतात...

**राम राज की कल्पना बेकार है**
**जब राज्य में स्वार्थ की सरकार है,**
**जनता को जो दे उनका अधिकार,**
**सबसे अच्छी है वही सरकार हैं...**

**खामगाव, जि. बुलडाणा.**

(लेखक हे दैनिक देशोन्नतीच्या बुलडाणा आवृत्तीचे संपादक आहेत.)

### अवकाश




**प्रा. सुरेश चोपणे**

9822364473

खगोल अभ्यासक अध्यक्ष- स्काय वॉच ग्रुप


## आंतरग्रहीय-तारकीय प्रवासातील अडचणी

रशियाच्या स्पुटनिक-१ उपग्रहाद्वारे ४ ऑक्टोबर १९५७ साली मानवाच्या उपग्रहीय अवकाश प्रवासाला सुरुवात झाली आणि १२ एप्रिल १९६१ ला मानव प्रथमता अवकाशात पोहोचला. त्यानंतरच्या अनेक मोहिमा चंद्रावर आखल्या आणि अपोलो ११ या मोहिमेद्वारे नील आर्मस्ट्राँग हा पहिला मानव २० जुलै १९६९ ला प्रथम चंद्रावर पोहोचला. आपण मंगळावर अनेक मोहिमा पाठविल्या; परंतु आज या मोहिमेनंतर ६५ वर्षे झाली; परंतु मानवाला मंगळावर जाता आलेले नाही. मागील लेखात आपण मंगळावर राहण्याच्या अडचणींची चर्चा केली होती आज आंतरग्रहीय आणि तारकीय प्रवासातील अडचणीसंबंधी चर्चा करू या!

विश्व अफाट आणि अनंत आहे आणि आपली गती मर्यादित आहे. मानवाच्या गतीची आणि अल्पायुषी असण्याची समस्या हीच प्रवासातील खरी अडचण आहे. विश्वात प्रवास करायचा असेल तर हजारो वर्षे जगण्यासाठी आणि प्रकाशाच्या गतीने जाण्यासाठी तसे यान विकसित करावे लागेल. मंगळावर जवळपास १५ कोटी कि.मी. जायला कमीत कमी ६ महिने लागतात. आज आपल्या यानांची गती तासी ४०,००० किमी आहे आपण आण्विक इंधन वापरले तर आपण २ महिन्यात मंगळावर पोहोचू शकू आणि प्रकाशाच्या गतीने जाऊ शकलो तर केवळ १३ मिनिटांत पोहोचू शकू. नासा आण्विक इंजिन बनविण्याची तयारी करीत आहे आणि ते २०२७ पर्यंत तयार होण्याची शक्यता आहे. इस्रोचासुद्धा असा प्रयत्न आहे. मंगळावर जीवन शोधायला किंवा राहायला जाण्यासाठी आण्विक यानाचीच गरज आहे; परंतु त्याही पुढे जीवन शोधायचे असेल तर गुरूच्या युरोपा ग्रहावर जीवनासाठी आवश्यक पर्यावरण असल्यामुळे तेथे जावे लागेल आणि तिथे जाण्यासाठी ९६ कोटी कि.मी. अंतर पार करायला आजच्या गतीने २ वर्षे लागेल. आपल्या सूर्यमालेतील शेवटचा घटक प्लुटो हा ५ अब्ज कि.मी. असून तिथे आजच्या गतीने पोहोचायला १० वर्षे लागतील.

आपल्या आकाशगंगेत अंदाजे २०० अब्जे तारे आहेत त्यात ५०० तारे हे २५ प्रकाशवर्षे दूर आहेत, तिथे जीवनदायी ग्रह पण असतील; परंतु आपली क्षमता तिथपर्यंतच आहे. जर आकाशगंगा शोधायची म्हटले तर एक लाख वर्षे जायला लागतील आणि अंड्रोमिडा या शेजारच्या आकाशगंगेत जायचे असेल तर अडीच लाख वर्षे लागतील. खगोल विश्व यापेक्षा लाखो पटीने विशाल आहे, तेव्हा मानव कधीही आकाश गंगेच्या मध्यापर्यंतसुद्धा जाऊ शकत नाही. विश्वाचा तर प्रश्नच नाही.'

मानवाला सूर्यमालेत प्रवास करायचा असेल तर एकदाच शक्य आहे; परंतु आंतर-तारकीय प्रवास करायचा असेल तर मात्र आण्विक इंजिन बनवूनसुद्धा उपयोग नाही. पृथ्वीपासून सर्वात जवळचा तारा प्रोक्झिमा-अल्फा सेंटोरी हा ४ प्रकाश वर्षे दूर आहे, प्रकाशाची गती एका सेकंदाला ३ लाख किमी आहे, म्हणजेच प्रकाशाला ४० ट्रिलीयन किमी अंतर पार करायला ४ वर्षे लागतील आणि आजच्या गतीने जायला मानवाला ४०,००० वर्षे लागतील. जर आपण न्युक्लीअर इंजिनच्या साहाय्याने जवळच्या ताऱ्याच्या पृथ्वीसारख्या ग्रहावर जायचे असेल तरीही मानवाला कमीतकमी १० हजार वर्षे लागतील. म्हणजेच आंतरतारकीय प्रवास करायचा असेल तर आपल्याला प्रकाशाच्या गतीने जावे लागेल आणि असे यान बनवायचे प्रयत्न करायला अजून किमान ५० वर्षे तरी लागतील; परंतु ते बनेल काय ह्याची शंकाच आहे. प्रकाशाची गती ही सर्वाधिक आहे आणि त्या गतीने जाण्यासाठी सुरुवातीलाच प्रचंड जोर लावावा लागेल आणि गती वाढवत जावे लागेल. अवकाशातील घर्षण, गुरुत्व आणि दबाव अशा अनेक नैसर्गिक शक्तींना यानाला तोंड द्यावे लागेल. यासाठी यानाला जितके लहान करता येईल तितकी त्याची गती जास्त असेल. म्हणूनच प्रकाश गती धारण करणे अत्यंत कठीण काम आहे. शास्त्रज्ञ यावरही उपाययोजनेच्या शोधात आहेत. जसे अवकाश वाकवीने, भुयारी मार्ग बनविणे (वोर्म होल) आणि इतरही मार्ग शोधण्याचे प्रयत्न होत आहेत; परंतु अजून अनेक वर्षे तरी यावर मार्ग निघणे शक्य वाटत नाही. निसर्गाच्या शक्तींचा उपयोग केला तर विज्ञानात अशक्य असे काहीच नाही; परंतु त्याला नक्कीच वेळ लागेल.

कल्पना करा, की आपण प्रकाशाच्या गतीने जाण्यासाठी अवकाशयान बनविले तरीही मुख्य समस्या हजारो वर्षे कसे जगायचे हे आहे. आपले आयुष्य जास्तीत जास्त १०० वर्षे आहे, लहान बाळाला यानात ठेवले तर त्याचा मृत्यू यानातच होईल तरीही यान सूर्यमालेच्या थोडे बाहेर गेलेले असेल. वैज्ञानिक यावर उपायोजनेच्या शोधात आहेत. त्यात आपले वय वाढविता येईल काय? अवकाश यात्रींना डीप फ्रीज करून ठेवता येईल काय? वय वाढविण्यासाठी आपल्या जनुकात बदल करता येईल काय? यावर विचार केल्या जात आहेत. आंतरग्रहीय आणि तारकीय प्रवासात अनेक अडचणी आहेत; परंतु आपल्या प्रयत्नाने आपण निसर्गावर काही प्रमाणात तरी मात करून विजय मिळविला तरी ते आपले यश असेल.


sureshchopane@gmail.com


### वाचक विचार मंच

## एक चुकीची अपडेट साऱ्या जगाला विचार करायला लावणारी...!

आज तंत्रज्ञानामुळे संपूर्ण जग एका क्लिकवर जवळ आले असले, तरी ते कसे ठप्प पडू शकते याचे उदाहरण नुकतेच संपूर्ण जगाने पाहिले. यामुळे अनेक सेवा ठप्प झाल्या. अनेक गोष्टींवर याचा मोठा परिणाम पाहायला मिळाले. इतकेच नाही तर करोडोंचे नुकसान देखील सहन करावे लागले तंत्रज्ञान एका सेकंदात सारे जग ठप्प करू शकते. याचा अनुभव पुन्हा एकदा जगाला आला. मायक्रोसॉफ्टमध्ये तांत्रिक बिघाडानंतर त्यावर अवलंबून असणारे सारे उद्योग, विमान उड्डाणे, बँकिंग सेवा, अनेक देशातले टीव्ही चॅनेल, विमानतळांचा कारभार, स्टॉक एक्स्चेंज आणि रेल्वेसहित अनेक सेवा विस्कळीत झाल्या. काही तासांच्या खोळंब्यात जगभरात अब्जावधींच्या नुकसानीचा अंदाज आहे. अमेरिकेपासून ब्रिटनपर्यंत, भारतापासून ऑस्ट्रेलियापर्यंत अनेक मोठमोठे व्यवसाय बंद पडले. मायक्रोसॉफ्टमधल्या तांत्रिक बिघाडाच्या फटक्यामुळे अनेक विमानतळांवरचे टाईमटेबल दर्शवणारे इंडिकेटर बंद होते परिणामी विमानतळांवर अशा पद्धतीने हाताने लिहून विमानांचे वेळापत्रक सांगितले गेले. विमानाची तिकिटेसुद्धा पेनाने तपासून प्रवाशांना आत सोडले जातेय. एकाच तांत्रिक बिघाडाने जवळपास जगातल्या अनेक देशांना पुन्हा कागद आणि फळ्यावर वेळापत्रक लिहण्याची वेळ आणली. मायक्रोसॉफ्टमध्ये बिघाड झाला तर जग कसे काय ठप्प होईल. असादेखील अनेकांना प्रश्न पडला आहे.

सॉफ्टवेअरमध्ये देण्यात आलेल्या चुकीच्या सुरक्षा प्रणाली अपडेटमुळेच मायक्रोसॉफ्ट या ऑपरेटिंग सिस्टिममध्ये अडचणी निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे. पुन्हा अशी अडचण येऊ नये म्हणून खबरदारी घेणे गरजेचे आहे.

**राजू जाधव**

मांगूर, जि. बेळगांव

### सल्ला

खोटेनाटे आरोप करून
विरोधकांना गुन्ह्यांत गोवणार
हा 'शहा'णपणा पुन्हा
'कमळाई'ला भोवणार

त्यांचाच 'संघ' म्हणतो
आरोप थांबवा बिनबुडाचे
'अहंकारा'मुळे सुरू आहे
राजकारण सुडाचे

'नमो' हरम केलयं मतदारांनी
घ्या ह्यातून काहीतरी धडा
वेळीच करा प्रायश्चित्त
नाहीतर भरेल पापाचा घडा

तुम्हीच पेरलेल्या विषवल्लीच्या
पुढे बिया राहतील ऊगवत
'परीवार' म्हणाला 'चौकीदारा'ला
ऐका वेळ काढून 'भागवत'

**अ‍ॅड. अनंत खेळकर**
अकोला

### जग भ्रमंती

## 'ही' आहेत जगातील सर्वात लांब प्लॅटफॉर्म असलेली स्टेशन्स...

भारतीय रेल्वेचा दबदबा संपूर्ण जगभरात आहे. भारतीय रेल्वे जगभरातील दुसरे सर्वात मोठे रेल्वे नेटवर्क आहे. एवढेच नाही तर जगातील सर्वात मोठ्या रेल्वे स्टेशन आणि प्लॅटफॉर्मचा किताबही भारताच्या नावे आहे. जगातील दहा सर्वात मोठ्या रेल्वे प्लॅटफॉर्मच्या यादीमध्ये ६ नावे भारतातील आहेत. हे स्टेशन कोणते आहेत हे तुम्हाला माहिती आहे का? आज आम्ही तुम्हाला या रेल्वे स्टेशनविषयी सांगणार आहोत.


देशाच्या कानाकोपऱ्यात, भारतीय रेल्वे मोठ्या संख्येने लोकांना त्यांच्या डेस्टिनेशनपर्यंत पोहोचवत असते. तसेच रेल्वेच्या सर्वात मोठ्या नेटवर्कद्वारे जवळपास प्रत्येक शहराला जोडते. हे जगातील मोठे रेल्वे नेटवर्क म्हणून ओळखले जाते. चला तर मग आज जाणून घेऊया भारतातील असे सात प्लॅटफॉर्म जे रेल्वे नेटवर्कमध्ये सर्वात लांब आहेत.

जगातील सर्वात लांब रेल्वे प्लॅटफॉर्म दक्षिण-पश्चिम रेल्वे झोनमधील हुबली रेल्वे स्टेशन आहे. यामध्ये, प्लॅटफॉर्म क्रमांक ८ ची लांबी १५०७ मीटर आहे, ज्याने जगातील सर्वात लांब रेल्वे प्लॅटफॉर्म म्हणून आपले नाव नोंदवले आहे. सर्वात लांब प्लॅटफॉर्मवरून दोन इलेक्ट्रिक इंजिन असलेल्या गाड्यांना एकाच वेळी हिरवा झेंडा दाखवला जाईल. दुसऱ्या ते चौथ्या क्रमांकावर भारतीय प्लॅटफॉर्म हुबळीपूर्वी गोरखपूर रेल्वे स्टेशन हे जगातील सर्वात लांब रेल्वे स्टेशन मानले जात होते. उत्तर प्रदेशचे गोरखपूर जंक्शन आता दुसऱ्या क्रमांकाचे मोठे प्लॅटफॉर्म बनले आहे. त्याची लांबी १,३६६.३३ मीटर आहे. यानंतर कोल्लम जंक्शन हे केरळमधील तिसरे सर्वात लांब प्लॅटफॉर्म आहे. त्याची लांबी ११८०.५ मीटर आहे. यानंतर खरगपूर (पश्चिम बंगाल) स्टेशन आहे, प्लॅटफॉर्मची लांबी ३१०७२.५ मीटर आहे.

यूएसचा शिकागो स्टेट स्ट्रीट सबवे पाचव्या क्रमांकावर आहे. प्लॅटफॉर्मची लांबी १०६७ मीटर आहे. यानंतर सहावा बिलासपूर (छत्तीसगड) स्टेशन आहे, या प्लॅटफॉर्मची लांबी ८०२ मीटर आहे. सातवे यूकेचे शेरेटन शटल टर्मिनल फोकस्टोन, प्लॅटफॉर्मची लांबी ७९१ मीटर. आठवे झाशी स्टेशन, प्लॅटफॉर्मची लांबी २५२६ ७७० मीटर. नववे पर्थ (पश्चिम ऑस्ट्रेलिया) मध्ये ईस्ट पर्थ रेल्वे स्टेशन प्लॅटफॉर्मची लांबी ७७० मीटर. दहावे कलगुर्ली स्टेशन (वेस्टर्न ऑस्ट्रेलिया), प्लॅटफॉर्मची लांबी ७६० मीटर आहे.



### गुल्लेर




**नरेंद्र इंगळे**

9561226572


## फेर काढत बसा...

'आता कोन्या वर्गात टाकला सोन्या?'

'पह्यलीत टाकला.. मोठा तिसरीत अन् पोरगी पाचवीत.. जानंयेनं पुरत नाही. खामगावले खोली केली.'

'वैनीले खोलीवर ठेवलं वाटते?'

'सैपाकाले ठेवलं तिले. मी तीन-चार दिवसातून चक्कर मारतो. घरी बुढी आहे भाकरी कराले.'

'तेही पुरलं.'

'पुरलं कायचं? लय खर्च वाढला. एक लाखाच्या वरते फी भरली तिघाईची.. बोटभर पोराची फी पसतीस हजार! त्याले आजून धुता येत नाही.'

'कॉन्व्हेंट म्हटलं की फी जादाच राह्यते. मोठमोठ्या शहरात दोनदोन लाख फी घेतात.'

'काय व्हय दोन लाख? आपल्यासारखा लंबाच होते.. वरचा खर्च लय आहे. पाच हजाराचे पुस्तकं.. त्याहिचे ड्रेस.. गाडीचा मयना.. आपून बसा पराटीवर फवारे मारत.'

'किती खर्च असला तरी लोकं शिकोतात. रमेसनं पाचही लेकरं शहरात शिकाले टाकले.'

'आपल्या टाईमले इतका खर्च होता काय?'

'हैत.. आपून गावातच शिकलो प्रायमरी शाळेत.. एक मराठीचं पुस्तक अन् एक गनिताचं! मराठीचं नवं पुस्तक एक रुपया वीस पैशाले भेटे. दीड रुपयाची पाटी.. महाबिजच्या थैलीचं दप्तर.. झाली शाळा! कयकले कपडे राह्यत.. पायात चप्पल नसे.. चालले गाट्यातून शाळेत'.

'गावातली शाळाच वसान पडली.'

'गुरुजीले काही फरक पडत नाही.. पगार सुरुच आहे.. वर्ग चार मास्तर दोन.'

'आपल्या टाईमले कडक शिक्षन होतं राज्या.. अंबळकार गुरुजी पाठीवर रट्टे देत.. चुकला की ठोकला. आता गुरुजीनं मारलं की त्याले फोन करून बेजार करतात.'

'लाडाचे लेकरं झाले भाऊ.. पह्यले आमचा बाप दळाल ठोकत जाय..'

'लेकरं नसल्यानं घर सुनं लागते राज्या.'

'आता काय इलाज त्याले? घरची मेन बाई गेली. आज तीन हप्ते झाले. मी कालच भेट घेऊन आलो. तुही वैनी उजटली तिकडे... गावात कावीभोर पडली होती. तिकडे मस्त तोंडाले फेशियल करते.'

'सांगा.. बाई तिकडे नखरा करते अन् तुम्ही बसा फेर काढत.'

# बिग बॉस ओटीटी ३ वर कारवाई करण्याची मागणी!

वृत्तसंस्था

**मुंबई** : 'बिग बॉस ओटीटी ३' शोचे निर्माते आणि स्पर्धक यांच्यावर तातडीची कारवाई व्हावी, असे एक निवेदन शिवसेना नेत्या प्रा.डॉ. मनीषा कायंदे यांनी मुंबई पोलीस आयुक्तांना सुपूर्द केले आहे. मनीषा कायंदे यांचे मुंबई पोलीस आयुक्तांना निवेदन मनीषा कायंदे यांनी आपल्या निवेदनात लिहिले आहे की, 'बिग बॉस ओटीटी सीझन ३'च्या निर्माते, प्रेक्षक व सहभागी कलाकारांवर तातडीने योग्य ती कारवाई करत प्रक्षेपण बंद करण्यात यावे.' त्यांनी पुढे लिहिले की, 'बिग बॉस ओटीटी सीझन ३' या रियॅलिटी शोचे प्रक्षेपण २१ जूनपासून सुरू झाले आहे. दररोज रात्री नऊ वाजता ओटीटीवर त्याचे प्रसारण होत आहे. दिवसेंदिवस लोकप्रिय होत असलेल्या ओटीटी प्लॅटफॉर्मवर दररोज लाखो कुटुंब हा शो बघत असतात. मात्र, १८ जुलै रोजी प्रसारित करण्यात आलेल्या या शोच्या भागामध्ये कलाकार कॅमेरासमोर अतिशय बिभित्स आणि किळसवाणे कृत्य करताना दाखवण्यात येत होते.



**मुंबई** : साडी असो की वेस्टर्न आऊटफिट; माधवी निमकरचे सौंदर्य पाहून व्हाल थक्क! तिच्या स्लिम फिगरकडे पाहून कोणालाही ती ४० वर्षांची असल्याचा विश्वास बसणार नाही.

# नैसर्गिक विधीसाठी बसला होता व्यक्ती

## १३ फुटी अजगराचा हल्ला!

**जबलपूर** : मध्य प्रदेशातील जबलपूरमध्ये नैसर्गिक विधीसाठी बसलेल्या एका व्यक्तीवर तब्बल १३ फूट लांबीच्या अजगराने हल्ला केला. या अजगराने माणसाची मान घट्ट आवळली होती. तसेच त्याला गिळण्याचा देखील त्याने प्रयत्न केला. मध्य प्रदेशातील जबलपूर येथील एका गावात अंगावर शहारा आणणारी ही घटना घडली आहे. एक व्यक्ती हा शौचास बसला असतांना एका १३ फूट लांबीच्या अजगराने त्याच्यावर हल्ला करत त्याची मान आवळून त्याला गिळण्याचा प्रयत्न केला. यावेळी या व्यक्तीने अजगराचे तोंड पकडून सुमारे २० मिनिटे त्याच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याला यश आले नाही. यावेळी त्याने अजगराचे तोंड हाताने घट्ट पकडून ठेवले होते. तर अजगर मात्र, त्या व्यक्ती भोवती आवळलेला फास आणखी घट्ट करत होता. त्याला त्याची सुटका करता न आल्याने त्याने आरडाओरडा केला. त्याचा आवाज ऐकून आजूबाजूचे नागरिक धावून आले. आरडाओरडा ऐकून ग्रामस्थ तेथे पोहोचले असता त्यांना धक्का बसला. अजगराने त्या व्यक्तीला वेटोळे घातले असल्याचे दिसले. नागरिकांनी त्या व्यक्तीची सुटका करण्यासाठी अजगराला काठ्या, दांडक्याने मारहाण केली.

# भर जत्रेत सर्वांसमोर जोडप्याचा रोमान्स

## लोक बनवत होते व्हिडिओ, पण थांबले नाहीत!

**मेरठ** : एका जोडप्याने जत्रेतच अश्लील कृत्य केले. महत्त्वाचे म्हणजे, तिथे उपस्थित असलेले लोक त्यांचा व्हिडिओ बनवत असूनही हे जोडपे थांबले नाही. उत्तर प्रदेशच्या मेरठ येथे देवी नवचंडीच्या नावाने जत्रेचे आयोजन केले जाते. या जत्रेत पोहोचलेल्या संबंधित जोडप्याने सर्वांसमोर अश्लील कृत्य करण्यास सुरुवात केली. मोठ्या संख्येने लोक तेथे उभे राहून जोडप्याचे अश्लील कृत्य पाहत आहेत. मात्र, तरीही जोडप्यांवर कोणताही परिणाम होत नाही. तिथे उपस्थित लोकांनी त्याचा व्हिडिओ रेकॉर्ड केला आहे, जो आता व्हायरल होत आहे. असे सांगितले जात आहे की, जोडप्याला त्यांच्या मित्रांनी चॅलेंज दिले होते, जे पूर्ण करण्यासाठी हे जोडपे जत्रेत असे कृत्य करताना कॅमेऱ्यात रेकॉर्ड झाले.

# आयएएस अधिकाऱ्याच्या बायकोचे गँगस्टरशी लफडे

## घरासमोर विष पिऊन दिला जीव

**गांधीनगर** : गुजरातमध्ये एका आयएएस अधिकाऱ्याच्या पत्नीने घराच्या दारासमोर विषप्राशन करून आत्महत्या केल्याने खबळळ उडाली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, काही काळापूर्वी या अधिकाऱ्याची ही पत्नी एका अट्टल गुन्हेगारासोबत पळून गेली होती. यानंतर ती एका मुलाच्या अपहरणात सहभागी असल्याची माहिती पुढे आली होती. या प्रकरणात अटक होण्याच्या भीतीने ही महिला तिच्या अधिकारी असलेल्या पतीला भेटीसाठी आली होती. मात्र, त्याने तिला घरात घेण्यास नकार दिल्याने तिने घराच्या दरातच विष प्राशन करून आत्महत्या केली. मिळालेल्या माहितीनुसार, महिलेने गांधीनगर येथे पतीच्या घरासमोर दारात उभे असताना विष प्राशन केले. त्यानंतर तिला तात्काळ सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. सूर्या (वय ४५) असे या महिलेचे नाव असून ती मुळची तामिळनाडूची रहिवासी आहे.

# जगातील सर्वात मोठी सोन्याची अंगठी

## बोटात घालणे सोडा डोक्यावरही उचलता येणार नाही

**दुबई** : प्रत्येकाला अंगठी घालायला आवडते. आजकाल सोन्यापेक्षा हिरे आणि इतर रत्नांनी बनवलेल्या अंगठ्या घालण्याचा ट्रेंड आहे. जगातील एक सर्वात मोठी एक सोन्याची अंगठी आहे, जी बोटात घालणे सोडा, लोक डोक्यावरही उचलू शकत नाहीत.



**६४ किलो वजनाची सोन्याची अंगठी**

जाणून आश्चर्य वाटेल की, या अंगठीचे वजन ६४ किलो म्हणजेच १४१ पौंड आहे. हे अंदाजे ११ पौंड म्हणजेच ५.१ किलो वजनाच्या मौल्यवान दगडांनी जडलेले आहे. त्याच्या सोनेरी चकाकीने डोळे चकीत होतात.

**अंगठीचे नाव गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये**

या मौल्यवान अंगठीचे नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंदवले गेले आहे. ही अंगठी २०१८ साली दुबईमध्ये बनवण्यात आली होती. त्यावेळी या अंगठीची किंमत तीन मिलियन डॉलर होती. ही अंगठी बनवणाऱ्या कंपनीने तिचे नाव नजमत तैयबा ठेवले. नजमत तैयबा ही अंगठी २१ कॅरेट सोन्याची बनवली होती. ही अनोखी अंगठी तयार करण्यासाठी ५५ कारागिरांना सलग ४५ दिवस प्रत्येकी १० तास काम करावे लागले.

# मंत्रिमंडळ विस्ताराची शक्यता मावळली

## शिंदे गटातील इच्छुकांचा हिरमोड

वृत्तसंस्था

**मुंबई** : राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन संपताच सर्व राजकीय पक्षांना येत्या ऑक्टोबरमध्ये होऊ घातलेल्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीचे वेध लागल्याने मंत्रिमंडळ विस्ताराची शक्यता जवळपास मावळली आहे. २०१९ मध्ये चौदाव्या विधानसभा निवडणुकीची घोषणा २१ सप्टेंबर २०१९ रोजी झाली होती. त्यामुळे आता ऑक्टोबर महिन्यातील निवडणुकीची घोषणा पुढील दोन महिन्यात म्हणजे २० ते २२ सप्टेंबर दरम्यान अपेक्षित आहे. निवडणुकीला अवघे दोन महिने बाकी असल्याने राज्य मंत्रिमंडळ विस्ताराची चर्चा थंडावली आहे.



राज्यातील महाविकास आघडीचे सरकार खाली खेचून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुतीचे सरकार जुलै २०२२ मध्ये स्थापन झाले. जवळपास ४० दिवस शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दोघेच राज्य सरकारचा कारभार हाकत होते. त्यानंतर ९ ऑगस्ट २०२२ रोजी शिंदे गट आणि भाजपचे प्रत्येकी ९ अशा एकूण १८ आमदारांना कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ देण्यात आली. तेव्हापासून पुढील मंत्रिमंडळ विस्तार लवकरच होईल, असे सांगण्यात आले. शिंदे, फडणवीस यांनी दिल्लीत चकरा मारूनही त्यांना मंत्रिमंडळ विस्ताराला परवानगी मिळाली नाही. गेल्या वर्षी २ जुलै रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सरकारमध्ये सामील झाला. अजित पवार यांच्यासह १० आमदारांना कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ देण्यात येणार होती. वाईचे आमदार मकरंद पाटील यांचा मंत्रिमंडळात समवेश होणार होता. मात्र, पक्षातील फुटीनंतर शरद पवार यांच्यासोबत राहायचे की अजितदादांना साथ द्यायची याचा निर्णय पाटील यांना लवकर घेता आला नाही. त्यामुळे अजित पवार तसेच त्यांच्या आठ सहकाऱ्यांना मंत्रिपदाची शपथ देण्यात आली. त्यानंतर गेले वर्षभर मंत्रिमंडळ विस्ताराचा विषय चर्चेत आला. पण त्याला मुहूर्त काही लागला नाही.



## जवानांकडून चोख प्रत्युत्तर

## जम्मू काश्मीरच्या राजौरीमधील घटना..

# लष्करी चौकीवर दहशतवाद्यांचा हल्ला

**गुंधा** : जम्मू-काश्मीरमधील राजौरी जिल्ह्यात दहशतवाद्यांनी पुन्हा एकदा लष्कराच्या तळावर हल्ला केला. राजौरी जिल्ह्यातील गुंधा भागात दहशतवादी आणि लष्कर यांच्यात चकमक झाली. दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याला भारतीय जवानांनी चोख प्रत्युत्तर दिले. सोमवार, २२ जुलै रोजी लष्कराने मोठा दहशतवादी हल्ला हाणून पाडला आहे.

माहितीनुसार पहाटे ३ वाजता दहशतवाद्यांनी लष्कराच्या छावणीवर गोळीबार केला, ज्यामध्ये एक जवान जखमी झाल्याची माहिती आहे. राजौरीतील दुर्गम गावात लष्कराच्या चौकीवर झालेला मोठा दहशतवादी हल्ला हाणून पाडण्यात आला आहे. हा हल्ला अशावेळी झाला आहे, जेव्हा लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी एक दिवस आधी जम्मूचा दौरा केला होता. गेल्या काही दिवसांत जम्मू-काश्मीरमध्ये लष्करावर अनेक दहशतवादी हल्ले झाले आहेत. ८ आणि १५ जुलै रोजी कठुआच्या माचेडी आणि डोडाच्या देसा जंगल भागात दोन वेगवेगळ्या दहशतवादी हल्ल्यांमध्ये एका कॅप्टनसह लष्कराचे नऊ जवान हुतात्मा झाले होते.

### जम्मू आणि काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ल्यांमध्ये वाढ

राजौरीमध्ये झालेल्या हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने सर्च ऑपरेशन सुरु केले आहे. माहितीनुसार, दहशतवाद्यांच्या हल्ल्यामध्ये एक जवान जखमी झाला आहे. त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून उपचार सुरु आहेत. गेल्या काही दिवसांपासून जम्मू आणि काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ल्यांमध्ये वाढ झाली आहे. जम्मू आणि काश्मीरमध्ये विधानसभेच्या निवडणुका दोन ते तीन महिन्यात लागू शकतात. या पार्श्वभूमीवर हे हल्ले वाढले असल्याचे बोलले जात आहे. या वर्षाच्या सुरुवातीपासून जम्मू प्रांतातील सहा जिल्ह्यांमध्ये झालेल्या सुमारे १२ दहशतवादी हल्ल्यांमध्ये ११ सुरक्षा जवान हुतात्मा झाले, तर एक ग्राम संरक्षण रक्षक देखील मृत पावला. पाच दहशतवाद्यांचा खात्मा देखील करण्यात आला.

# पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या नावाखाली होतोय मोठा फ्रॉड

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्ली** : शेतकऱ्यांना आर्थिक लाभ व्हावा, त्याचप्रमाणे त्यांना योग्य प्रमाणात शेती करता यावी, यासाठी केंद्र सरकारकडून शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवल्या जातात. यात सरकारकडून पंतप्रधान सन्मान निधी योजना चालवली जाते. ही योजना खूप लोकप्रिय योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक मदत केली जाते. या योजनेद्वारे पात्र असणाऱ्या शेतकऱ्यांना वर्षाला सहा हजार रुपये दिले जातात. चार महिन्यांच्या अंतरांनी तीन समान हफ्त्यांमध्ये ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये वितरित केली जाते. परंतु आता या योजनेच्या नावाखाली शेतकऱ्यांची फसवणूक केली जाते. याची माहिती समोर येत आहे.



गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या नावाखाली एक लिंक व्हायरल होत आहे. या लिंकवर क्लिक केल्यावर शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आलेला आहे. त्यामुळे कोणत्याही शेतकऱ्यांनी कोणत्याही प्रकारच्या लिंकवर क्लिक करू नये, असे आव्हान पोलिसांकडून करण्यात आलेली आहे. ही सायबर आहे. तुम्ही या लिंकवर क्लिक केल्यावर तुमच्या मोबाईलमध्ये एक ?प्लिकेशन

### शेतकऱ्यांना बसतोय आर्थिक भुर्दंड

डाऊनलोड होते. त्यानंतर शेतकऱ्याचा संपूर्ण मोबाईल आणि सिम कार्ड देखील हॅक होते. समोरील व्यक्ती मोबाईल्स आणि सिम कार्डचा ताबा घेतो, त्याद्वारे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करूनये, अन्यथा त्यांना मोठ्या प्रमाणात भुर्दंड बसू शकतो, असा इशारा सायबर सेल द्वारे दिला जात आहे. सध्या सायबर क्राईमचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत चाललेले आहे. अशा प्रकारची कोणतीही फसवणूक जर शेतकऱ्यांची झाली असेल, तर त्यांनी ९३३० या हेल्पलाइन नंबरवर कॉल करून तक्रार दाखल करायची आहे.

# ग्रँटरोडमधील व्यवसायिकाला बनावट शिल्पे विकली

## २२ लाखांची फसवणूक

देशोन्नती वृत्तसंकलन

**कोलकाता** : कोलकाता येथे आर्ट गॅलरी असल्याचे सांगत पेंटिंग आणि शिल्प देण्याचे आमिष दाखवून बाप-लेकाने ग्रँटरोडमधील व्यवसायिकाला बनावट शिल्पे विक्री करुन २२.२० लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी फसवणुकीचा गुन्हा दाखल करुन डॉ. दा. भ. मार्ग पोलीस अधिक तपास करत आहेत.

ग्रँटरोड येथील रहिवासी असलेल्या ५८ वर्षीय फिर्यादी यांचा लॅमिंग्टन रोड येथे पेटींग आणि शिल्प खरेदी विक्री करण्याचा व्यवसाय असून, सध्या ते ताडदेवमध्ये राहतात. प्रकाश केजरीवाल नावाच्या व्यक्तीने कॉल करत त्याची कोलकाता येथे आर्ट गॅलरी असल्याचे सांगत पेंटिंग आणि शिल्प देण्याचे आमिष दाखविले. तीन दिवसांनी त्याने फिर्यादी यांना काही पेंटिंग आणि शिल्पांचे फोटो पाठवले. फिर्यादी यांना यातील एक शिल्प आवडले. फिर्यादी यांनी शिल्प



बघण्यासाठी कोलकाता गाठले. त्यांना प्रकाश आणि त्यांचा मुलगा प्रभास भेटले. दोघांनी त्यांना जुनी शिल्पे आणि इतिहासाची प्रमाणपत्रे दाखवली. एका शिल्पाची किंमत त्यांनी ११ लाख रुपये सांगितली. फिर्यादी यांनी शिल्प खरेदी करण्यासाठी प्रकाश आणि प्रभास यांना रोखीने साडेपाच लाख रुपये दिले. शिल्प सोबत घेऊन फिर्यादी हे मुंबईत परतले. त्यानंतर, त्यांनी उरलेली रक्कम प्रकाश आणि प्रभास यांना पाठवली. फिर्यादी यांनी त्यांच्याकडून ११ लाख रुपयांना आणखी एक शिल्प खरेदी केले. दोन्ही शिल्प फिर्यादी यांनी आपल्या कार्यालयात ठेवली. फिर्यादी यांनी दोन्ही शिल्पे विक्रीसाठी काढली असता त्यांना ही शिल्पे बनावट असल्याचे समजले. फिर्यादी यांनी प्रकाश आणि प्रभास यांना शिल्पे बनावट असल्याचे सांगत पैसे परत करण्याची मागणी केली.

# प्रसिद्ध गायक राहत फतेह अली खान यांना अटक

वृत्तसंस्था

**दुबई** : पाकिस्तानी गायक राहत फतेह अली खान यांना अटक करण्यात आल्याचे वृत्त समोर आले आहे. दुबई विमानतळावरून राहत फतेह अली खान यांना अटक करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

पाकिस्तानमधील मीडिया रिपोर्ट्सनुसार, आर्थिक देवाण-घेवाणीच्या संदर्भात सुरू असलेल्या



वादानंतर अटकेची कारवाई करण्यात आली आहे. त्यांचे माजी मॅनेजर सलमान अहमद यांच्या तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आली आहे. राहत फतेह अली खान यांना पोलीस स्टेशनमध्ये नेण्यात आले असून त्यांची चौकशी सुरू आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, राहत फतेह अली खान यांचा माजी मॅनेजर सलमान अहमद याने दुबईत राहत फतेह अली खान यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली होती. त्याच प्रकरणात ही अटकेची कारवाई करण्यात आली आहे. राहत फतेह अली खान हे त्यांच्या गाण्याच्या कार्यक्रमासाठी लाहोर येथून दुबईला पोहोचले, त्यावेळी ही कारवाई करण्यात आली.

## मध्य प्रदेश व ओडिशा राज्य काँग्रेस कमिटी बरखास्त

**नवी दिल्ली**: काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी मध्य प्रदेश व ओडिशा राज्य काँग्रेस कमिटी बरखास्त केली आहे. लोकसभा आणि राज्य विधानसभा निवडणुकीत पक्षाच्या खराब कामगिरीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी हा मोठा निर्णय घेतला आहे.



**माथेरान** : जुम्मापट्टी हा नेरळ आणि माथेरान दरम्यान असलेला धबधबा आहे. हा धबधबा मुंबईपासून अवघ्या दोन तासांवर आहे. पावसाळा सुरु झाला की आठ दिवसात जुम्मापट्टी धबधबा वाहू लागतो. येथे लोकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते.

# दररोज 10 किलो अन्न खाणारीने गमावला जीव!

**चीन** : एका फालतू प्रयत्नात एका तरुणीला आपला जीव गमवावा लागला. संबंधित तरुणी सर्वात जास्त जेवायची पैज लावून लोकांचे मनोरंजन करायची. मिळालेल्या माहितीनुसार, ही तरुणी दररोज १० किलो जेवायची. जेवणाच्या स्पर्धेत तिने अनेक बक्षीस जिंकले. मात्र, एकदिवस हा प्रयोग तिच्या जीवा बेतेल, याची तिने कधीच कल्पनाही केली नसेल. हे प्रकरण

### सर्वात जास्त जेवायची पैज..

चीनचे आहे. पॅन जियाओटिंग असे मृत्यू झालेल्या तरुणीचे नाव आहेत. ही तरुणी फक्त २४ वर्षांची आहे. फूडशी संबंधित चॅलेंज स्वीकारून पॅनने खूप प्रसिद्धी मिळवली. मिळालेल्या माहितीनुसार, पॅनने १४ जुलै रोजी असेच चॅलेंज स्वीकारून अन्न खाते, ज्याचे सोशल मीडियावर थेट प्रक्षेपणही केले जात होते. हे चॅलेंज जिंकणाऱ्यांना सन्मान, पुरस्कार आणि सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळणार होती. यासाठी पॅनने आपला जीव धोक्यात घालून स्पर्धेत भाग घेतला आणि बक्षीसही जिंकले. पण तिने कधीच विचारही केला नसेल की, हे बक्षीस तिच्या आयुष्यातील शेवटचे बक्षीस ठरेल. या चॅलेंजला मुकबांग म्हणतात. मुलीच्या आई-वडिलांनी तिला इतके खाण्यास मनाई केली होती, पण तिने त्यांचे ऐकले नाही.

# जिंदाल स्टीलच्या सीईओला गमवावी लागली नोकरी !

## फ्लाईटमध्ये विनयभंग...

**मुंबई** : जिंदल स्टील या नामांकित कंपनीचे वरीष्ठ अधिकारी आणि जिंदल स्टिलच्या ओमान येथील व्हल्कन ग्रीन स्टील या कंपनीचे सीईओ दिनेश कुमार सरोगी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका महिलेने विमान प्रवासादरम्यान लैंगिक छळ केल्याचा आरोप केल्यानंतर सीईओ दिनेश सरोगी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कंपनीने देखील त्यांच्यावर कारवाई करत



कंपनीतून पायउतार होण्यास सांगितले आहे. पीडित तरुणीने ट्विटरवर पोस्ट टाकल्यानंतर या घटनेची माहिती समोर आली. पीडित तरूणी अनन्या छोछरिया हिने ट्विटरवर पोस्ट करत म्हटले की, इतिहाद कंपनीच्या विमानाने कोलकाताहून अबू धाबीला जात होती. अबू धाबीहून तिला लंडनची कनेक्टेड फ्लाईट पकडायची होती. माझ्या शेजारी जिंदल कंपनीचे सीईओ दिनेश सरोगी बसले होते. त्यांचे वय जवळपास ६५ पर्यंत असावे. त्यांनी मला त्यांच्याबद्दल माहिती दिली आणि माझ्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. आमचा संवाद पुढे जात असताना त्यांनी माझे छंद काय आहेत, हे जाणून घेतले. ते म्हणाले की, तुला चित्रपट पाहायला आवडतात का? मी हो म्हटल्यानंतर त्यांनी त्यांचा फोन बाहेर काढला आणि त्यावर काही चित्रपट असल्याचे त्यांनी सांगितले.

# भारतातील सर्वात धोकादायक रेल्वे ट्रॅक

देशोन्नती वृत्तसंकलन

**चेन्नई** : भारतीय रेल्वे हे जगातील चौथ्या क्रमांकाचे सर्वात मोठे रेल्वे नेटवर्क आहे. भारतीय रेल्वे काश्मीर ते कन्याकुमारी आणि कच्छ ते कोलकाता अशा सर्व दिशांना धावतात. या काळात भारतीय रेल्वे वेगवेगळ्या मार्गांवरून जाते. भारतीय गाड्या कधी पठारावरून, कधी डोंगरातून तर कधी साध्या रस्त्यांवरून, नद्या आणि धबधब्यांमधून आपल्याला आपल्या गंतव्यस्थानावर घेऊन जातात.

भारतात एक असा रेल्वे ट्रॅक आहे, की या रेल्वे ट्रॅकवरून जेव्हा एखादी गाडी जाते तेव्हा त्यात बसलेल्या प्रवाशांची अवस्था बिकट असते. हा ट्रॅक असा आहे की, त्यावरून जाताना ट्रेनमध्ये बसलेले प्रवाशी घाबरलेले असतात. अनेक प्रवाशांना ट्रेन समुद्रात बुडण्याची भीती असते.

### रामेश्वरम पंबन रेल्वे पूल


आपण ज्या रेल्वे ट्रॅकबद्दल बोलत आहोत तो म्हणजे रामेश्वरम पंबन रेल्वे पूल. त्याला ब्लू सी राइड असेही म्हणतात. हा १०० वर्षांहून अधिक जुना आहे. दोन्ही बाजूंनी उसळणाऱ्या समुद्राच्या लाटा या २.२ किलोमीटरच्या रेल्वे ट्रॅकवरून जाताना तुम्हाला दोन्ही बाजूंनी समुद्राच्या उसळणाऱ्या लाटा दिसतील.

### रेल्वे ट्रॅक बांधला समुद्रावर

खरे तर, भारतात असा रेल्वे ट्रॅक आहे जो समुद्रावर बांधलेला आहे. हा ट्रॅक तामिळनाडूमध्ये आहे. हा जगातील सर्वात धोकादायक रेल्वे ट्रॅक मानला जातो. त्याच वेळी, हा सर्वात रोमांचक रेल्वे ट्रॅक देखील मानला जातो.

**समुद्रात पडल्यासारखी वाटते भीती** - या पुलावरून जाताना रेल्वे पाण्यावर चालत असल्याचा भास होईल. अनेक वेळा समुद्राची धोकादायक लाट ट्रेनला धडकून ट्रेन थेट समुद्रात जाईल असे वाटते.

### समुद्राच्या अगदी मधोमध..



# वाट्टेल तसे वागणे महागात पडणार?

## सोनीमोहचा मुख्याध्यापक, माजी अध्यक्ष भलतेच करामती • पालकांना अंधारात ठेवून शालेय समिती स्थापन • शेवटी नियमांचे उल्लंघन येणार अंगलट

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील जि.प.प्राथमिक शाळा सोनीमोहा येथील शालेय व्यवस्थापन समितीची मुदत ही दि. १० फेबुवारी २०२४ ला कार्यकाळ संपाला आहे. त्यानंतर नवीन शालेय व्यवस्थापन समिती स्थापन करण्यासाठी पालकांनी व ग्रामस्थांनी अर्ज दिलेला असताना देखील तत्कालीन सेवानिवृत्त होणारे मुख्याध्यापक माणिक गणपतराव मुंडे व तत्कालीन शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांनी कसल्याही प्रकारची बैठक अथवा पालकांना सुचना पत्र न देता गावातील कोणत्याही पालकांना विश्वासात न घेता व त्यांना मतदानापासून वंचित ठेवून कागदोपत्री अनाधिकृत शालेय व्यवस्थान समिती पूर्वीच्याच लोकांना नाव बदल करून निवड करण्यात आलेली आहे. हा प्रताप सेवानिवृत्त होणारे मुख्याध्यापक व तत्कालीन शालेय समितीचे अध्यक्ष यांनी केला आहे, लोकशाही ला काळीमा फासणाचे काम करण्यात आले आहे.

ही शालेय व्यवस्थापन समिती कोणत्याही पालकांना मान्य नसल्यामुळे ही रद्द करून सर्व पालकांची पालक बैठक बोलावून चर्चा विचार विनीमय करून सर्व पालकांसमक्ष नविन शालेय व्यवस्थापन समितीची निवड पान २ वर...



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोनिमोहा येथे गेल्या चार महिन्यांपासून मुख्याध्यापक पद रिक्त असून पदाचा मुख्याध्यापक नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शालेय कामकाजात अडचण येत असून मुख्याध्यापक पद त्वरित भरण्यात यावे अशीही मागणी पालकांनी शिक्षणाधिकारी बीड यांच्या कडे केली आहे.

सदरील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोनिमोहा येथील शालेय व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन करताना तत्कालिन मुख्याध्यापक व त्यावेळेस चे शा.व्य. स अध्यक्ष यांच्या मध्ये आर्थिक व्यवहार झाल्याचा वास येत असल्याचे येथील पालकांनी सांगितले आहे, तात्काळ अनाधिकृत तयार करण्यात आलेली शालेय व्यवस्थापन समिती रद्द करून कार्यवाही करण्यात यावी अन्यथा शाळेसमोर उपोषणास बसण्याचा इशारा पालकांनी शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद बीड यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

## महसूल संपामुळे शैक्षणिक प्रमाणपत्रे अडकली!

समस्या : तारीख वाढवून देण्याची पालकांची मागणी



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

सध्या महाराष्ट्रातील महसूल कर्मचाऱ्यांचा विविध मागण्यासाठी संप सुरू आहे. या संपामध्ये परळी तहसील कार्यालयातील महसूल कर्मचारी सहभागी झाले आहेत या दरम्यान अनेक शाळा, महाविद्यालयात विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुद्धा सुरू आहे .प्रवेशादरम्यान लागणारे कागदपत्रे कर्मचाऱ्यांच्या संपामुळे अडकले आहेत.त्यामुळे विद्यार्थी आणि पालक वर्ग वेळेवर कागदपत्र मिळत नसल्याने अडचणीत सापडला आहे. संप कधी सुटेल याची शाश्वती नसल्याने विद्यार्थ्यांना लागणाऱ्या प्रमाणपत्र साठी शासनाने तारीख वाढवून द्यावी अशी मागणी पालक वर्गातून होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की महाराष्ट्रातील महसूल कर्मचाऱ्यांचा सध्या संप सुरू आहे. नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाल्याने तहसील कार्यालय उपविभागीय कार्यालयामार्फत जातीचे, उत्पन्नाचे, नॉन क्रिमिलियर, रहिवासी, अधिवास अशा प्रकारचे अनेक प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना महाविद्यालयात पान २ वर...

## ...म्हणून परळी विधानसभेचा निर्णय!

राजेसाहेब देशमुख : परळीमध्ये पत्रकार परिषद




परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळीचा सर्वांगिण विकास, श्रीक्षेत्र प्रभु वैद्यनाथ नगरीला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी तसेच सर्वधर्मीय, सर्वसामान्य माणसाला सुख, समाधान, आनंदी व भयमुक्त वातावरणात जगता यावे, तसेच परळी शहर व मतदारसंघात शांतता, सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आपण निवडणूक लढविणार आहोत अशी घोषणा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी मंगळवार दिनांक २३ जुले रोजी आयोजित पत्रकार परिषदेतून केली.बीड जिल्ह्यात आम्ही भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय नेत्या खासदार सौ. रजनीताई पाटील, प्रदेशाध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले, माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली काम करीत आहोत. लोकसभा निवडणुकीतील लक्षवेधी विजयानंतर महाविकास आघाडीवरील सर्वसामान्य जनतेचा विश्वास कायम आहे. हे पुन्हा एकदा दिसून आले आहे. बीड जिल्ह्यात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडे समविचारी पक्ष व संघटनेतील नेते आणि कार्यकर्ते यांचा ओढा वाढत आहे. अनेक जण काँग्रेस पक्षाच्या संपर्कात आहेत. काँग्रेस पक्ष विधानसभा निवडणुक पूर्ण ताकदीने लढविणार आहे. याचाच एक भाग म्हणून मी स्वतः परळी धानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष देशमुख यांनी दिली.

ते पुढे म्हणाले की, बारामती, लातूर, पुणे शहराच्या धर्तीवर परळी शहरासह संपूर्ण मतदारसंघाचा विकास करणे आणि परळी शहर व मतदारसंघात शांतता, सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आपण निवडणूक लढविणार आहोत. आपण निवडणूक लढवावी अशी परळी विधानसभा मतदारसंघातील सर्वधर्मिय ,मतदारांची आणि सर्वसामान्य माणसाची प्रामाणिक इच्छा आहे. त्यांच्या भावनेचा आदर करून तसेच परळीचा सर्वांगिण विकास, श्रीक्षेत्र प्रभु वैद्यनाथ यांच्या नगरीला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी आपण परळी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणार आहोत. याबाबत मी व माझ्या सहकाऱ्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय नेत्या खासदार सौ. रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रभारी रमेशजी चेन्निथला, प्रदेशाध्यक्ष आ. नानाभाऊ पटोले यांना भेटून आपणांस उमेदवारी देण्याची विनंती केली आहे. तसेच परळी विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीला तिकीट मागणार असून याबाबत आपण महाविकास आघाडीचे ज्येष्ठ नेते खा. शरदचंद्र पवार , माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे , पान २ वर...

## ब्रम्हगाव येथे सार्वजनिक जन्मोत्सव!

अनिल कांबळे: आण्णाभाऊ साठे जयंतीची तयारी

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी



शहरापासुन जवळच असलेल्या ब्रम्हगाव येथे लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाउ साठे सार्वजनिक जन्मोत्सव २०२४ चे आयोजन ब्रम्हगाव येथे करण्यात आले असुन कार्यक्रमास उद्घाटक म्हणुन पालकमंत्री ना. धनंजय मुंडे तर अध्यक्षस्थांनी मानवी हक्क अभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मिलींद आवाड यांची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक अनिल राधे कांबळे यांनी केले आहे.

लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाउ साठे सार्वजनिक जन्मोत्सवात दि. २८ जुलै रोजी सायं. ६.०० वाजता गायिका कडुबाई खरात व शाहीर युवराज ढगे आणि संच यांचा गायनाचा कार्यक्रम तर दि. १ ऑगस्ट सकाळी १०.३० वा. भव्य मोटारसायकल व ॲटोरिक्षा रॅली छत्रपती संभाजी महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे अनिल राधे मित्र परिवाराच्या वतीने काढण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणुन पालकमंत्री ना. धनंजय मुंडे तर अध्यक्षस्थांनी मानवी हक्क अभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मिलींद आवाड यांची उपस्थिती असणार आहे तर विशेष उपस्थितीत वाल्मीक कराड, आ. प्रकाश सोळंके, ओमप्रकाश शेटे, नितीन नाईकनवरे बाबुराव पोटभरे, बाबरी मुंडे, राम राठोड, डॉ. सुरेश साबळे, शिवाजी रांजवण, मंजुर शेख, सभापती जयदत्त नरवडे, कल्याण आबूज, दिपक मेंडके, सुशिल डक, बिलाल चाउस, सचिन सानप, पान २ वर...

## जन्मदिन शैक्षणिक सप्ताहाने साजरा

नियोजन : प्रणव परळीकर यांचा अभिनव उपक्रम

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक नेते प्रणव परळीकर यांनी स्वखर्चातून राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार तसेच कृषिमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शैक्षणिक सप्ताह साजरा करत परळी शहरातील विविध शाळांमध्ये गटनेते वाल्मिक अण्णा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना तब्बल १० हजार वह्यांचे मोफत वाटप केले आहे. शहरातील वैद्यनाथ विद्यालय,श्रीमती कृष्णाबाई देशमुख विद्यालय, मिलींद विद्यालय, श्री सरस्वती विद्यालय या शाळेत वाटप करण्यात आले व इतर शाळेत वाटप करण्यास उद्यापासून सुरूच असणार आहेत.



या अभिनव उपक्रमाची सुरुवात शाळेत विद्यार्थ्यांना मोफत वह्या देऊन करण्यात आली. यावेळी तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, माजी नगराध्यक्ष दिपक देशमुख,माजी उपनगराध्यक्ष सुरेश टाक, रविंद्र परदेशी, सरचिटणीस अनंत इंगळे, माजी नगरसेवक अजिज कच्छी, जालिन्दर नाईकवाडे, राजेंद्र सोनी, महेंद्र रोडे, लालाखान पठाण,संजय देवकर, रामेश्वर कोकाटे, बळीराम नागरगोजे, मधुर ढाकणे, बालाजी घोडके, लखन ठाकुर, चंद्रप्रकाश हालगे वैद्यनाथ विद्यालयाचे हरिश पान २ वर...

## विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

दुःखद : सासरच्या मंडळी विरोधात गुन्हा

तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील तेलगाव नाका परिसरातील एका विवाहितेला सासरच्या मंडळीकडून कुलरचा मोठा कारखाना टाकण्यासाठी माहेरहून १५ लाख रुपये आण म्हणत सतत त्रास देण्यात येत होता. शारीरिक आणि मानसिक छळ करण्यात येत होता. यामुळे त्रस्त होऊन पंचवीस वर्षीय विवाहितेने गळफास घेत आत्महत्या केली. याप्रकरणी पेठ बीड पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बीड शहरातील शहेनशहा नगर

भागात राहणारे शहेनशाह युसुफ शेख यांची बहीण नजराना फहाद सय्यद हिचे लग्न काही वर्षांपूर्वी तेलगाव नाका परिसरातील फहाद कदीर सय्यद याच्याशी झाले होते. लग्नानंतर त्यांनी काही दिवस नजरानाला चांगले नांदवले परंतु नंतर नवरा फहाद सय्यद याच्यासह फराना कबीर सय्यद, कदीर सय्यद, फैसल कदीर सय्यद, लायबा फैसल सय्यद सर्व राहणार तेलगाव नाका, पेठ बीड यांनी कुलरचा पान २ वर...

## भारतीय किसान संघाचे अधिवेशन!

धोरण : कार्यकरिणीची करण्यात आली निवड



तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारतीय किसान संघाचे एक दिवसीय अधिवेशन वैष्णवी मंगल कार्यालय माजलगावं येथे दिनांक २२ जुलै २०२४ रोजी उत्साहात संपन्न झाले. सर्वप्रथम कार्यकर्त्यांचा परिचय करून देण्यात आला नंतर पुढील तीन वर्षासाठी भारतीय किसान संघाची कार्यकारणी निवडण्यात आली. कार्यकारणी निवडणूक अधिकारी म्हणून प्रदेश संघटन मंत्री मा.दादा लाड यांनी काम केले. नंतर त्यांनी आपल्या ओघावत्या शैलीत जिल्हा कार्यकारिणीच्या कार्यकर्त्यांना मौलिक मार्गदर्शन केले . संघटनेचा कार्यकर्ता कसा असावा त्यांच्यात कोणते गुण असावेत? याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले . यावेळी भारतीय किसान संघाचे प्रांत अध्यक्ष बळीराम सोळंके यांनी ग्राम समितीचे कार्य, तालुका समितीचे कार्य व जिल्हा समितीचे

## अतिथी लॉजच्या खूर्पे बंधुकडून मारहाण

कारवाई : पीडितांची माजलगाव पोलिसांत फिर्याद

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील प्रसिद्ध असलेले अतिथी लॉजचे मालक ओंकार खुर्पे , चंदु खूर्पे व इतर यांनी मिळून एका १४ वर्षीय बलत्कारीत मुलीसह तीची आई व भावाला मारहाण केल्याची घटना अतिथी लॉज वर घडली असुन खुर्पे बंधु विरोधात शहर पोलिस ठाणे माजलगाव येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सविस्तर असे कि गेल्या कांही दिवसा पूर्वी अतिथी लॉज वर एका १४ वर्षीय मुलिला जबरदस्ती नेऊन अत्याचार केल्याची घटना घडली होती त्यावर लॉज चालकांच्या विरोधात शहर पोलिस ठाण्यात तक्रारही दाखल करण्यात आली होती. परंतु पोलिसांकडून लॉजचं कुठलंही परीक्षण झालेलं नाही अथवा लॉज चालकांची कसलीही चौकशी झालेली नसल्याचं बोललं जात आहे.दिनांक २२ रोजी सायंकाळी ९ च्या सुमारास पिडीत मुलगी तीची आई व भाऊ अन् आईचा मामा हे कुमार ड्रैसेस पान २ वर...

दुदृष्टी — आ.लक्ष्मण पवारांच्या संकल्पनेतून स्विमिंग पूल पूर्णत्वास

# अडीचशे विद्यार्थी शिकले पोहायला

सुशिल टकले/गेवराई

गेवराई शहरात सुसज्ञ व सर्व सुविधांनी युक्त स्विमिंग पूल असावा असा निर्णय विधानसभेचे आमदार लक्ष्मण पवार यांनी घेतल्यानंतर नगर परिषदेच्या माध्यमातून स्विमिंग पूल चे काम अनेक दिवस चालू होते आणि उन्हाळ्यामध्ये लोकसभा निवडणूक आल्याने आचारसंहितेमुळे स्विमिंग पूल सुरू होईल का नाही याची खात्री नव्हती परंतु उन्हाळ्यात गेवराईकरांना स्विमिंग पूल वापरासाठी मिळावा याहीतूने आमदार लक्ष्मण पवार यांनी लोकसभा निवडणूक आचारसंहिता लागण्याच्या अगोदर स्विमिंग पूल सर्वसामान्यांसाठी खुला केला या स्विमिंग पूल च्या माध्यमातून ४०० ते ५०० गेवराईतील नागरिक रोज पोहू लागले. याचबरोबर अडीचशे ते तीनशे विद्यार्थी या स्विमिंग पूल मध्ये पोहण्यास शिकले. आज ही विद्यार्थी कुठल्याही सहलमध्ये समुद्रकिनारा असो किंवा वॉटर पार्क यामध्ये गेले असता आपला जीव तरी वाचू शकतात कारण की काही दिवसापूर्वीच एका शाळेची सहल वॉटर पार्क मध्ये गेले असता त्या ठिकाणी दुर्घटना झाल्याची बातमी आपण सर्वांनी वाचली आहे. पोहणे शरीरासाठी पान २ वर...



दररोज पोहण्याने कॅलरी बर्न होण्यास मदत होते आणि शरीर तंदुरुस्त राहते. पोहण्याने चालण्यापेक्षा कॅलरी जलद बर्न होतात आणि वजन कमी होण्यास मदत होते. रोज पोहल्याने मनाला शांती मिळते. यामुळे नैराश्य कमी होण्यासोबतच चिंतेची समस्याही दूर होते. पोहण्यामुळे चांगली झोप लागते. पोहल्याने रक्तदाब कमी होण्यास मदत होते. त्यामुळे शरीरात रक्ताचा प्रवाह लवकर होतो. त्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहण्यासोबतच हृदयही दीर्घकाळ निरोगी राहते. सर्वांग व्यायाम होतो फुफुसासाठी देखील फायदेशीर आहे. बेली फॅट जळण्यास मदत होते. रोज पोहल्याने हाडे मजबूत होतात आणि हाडांचे दुखणेही सहज निघून जाते. रोज पोहल्याने शरीर लवचिक तसेच चपळ बनते. हा एक प्रकारचा व्यायाम आहे, जो शरीराला तंदुरुस्त ठेवण्यासह शरीर लवचिक बनवण्यास मदत करतो. दररोज अर्धा तास पोहणे सहज शक्य आहे.

–डॉ अशोक काळे ,
अध्यक्ष,डॉक्टर असोसिएशन गेवराई

## विठ्ठल बिरुदेव यांची परज यात्रा

आध्यत्मिक : भाविकांची लक्षणिय गर्दी

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

गुरुपौर्णिमा निमित्त केज शहरात विठ्ठल बिरुदेव यांची परज यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न झाली आहे. भंडाऱ्याची उधळण व ढोलांचा गजर करत विठ्ठल बिरुदेवाच्या जय घोषाने केजशहर दुमदुमुन गेले. विठ्ठल बिरुदेव परज यात्रेचे आयोजन केज शहरातील धनगर समाज बांधवांच्या वतीने करण्यात आले होते. याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, गुरुपौर्णिमेच्या दिवशी रवीवार दि.२१ जुलै २०२४रोजी विठ्ठलबिरुदेव यांची परज यात्रा ही गेले अनेक दशकापासून धनगर समाज बांधव हे केज शहरात मोठ्या उत्साहात साजरी करत आहेत. दिनांक २१ जुलै २०२४ रोजी सकाळी ९–३० वाजता केज शहरा तील शनी मंदिर या भागा तील राजेभाऊ डुकरे यांच्या घरी होऊन परज यात्रेला प्रारंभ करण्यात आला. राजेभाऊ डुकरे यांच्या घरी येऊन परज यात्रा शनी मंदिर मार्गे मंगळवार पेठ कॉर्नर, मेन रोडने कानडीचौक, कानडी रोड मार्गे वकीलवाडी येथील हनुमान मंदिर, पंचायत समिती ग्राउंड मार्गे उमरी रोडने खंडोबा मंदिर, उमरी रोडने शिक्षक कॉलनी मार्गे बीड रोडने आयटीआय कॉलेज पासून विठ्ठल बिरुदेव मंदिर येथे परज यात्रा पोहोचल्यानंतर पान २ वर...

